शब्द
# रुची

ऑगस्ट २०१४
मूल्य १० रुपये

४०



# प्लँचेटनामा
## अंधश्रद्धेचे वास्तव

# जगभर कुणीही शिकावी अशी...

# माय मराठी – My Marathi

## मराठी शिकवणारे सुलभ मार्गदर्शन

**मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागाने तयार केलेला**
**ग्रंथालीने प्रकाशित केलेला**
**एक अपूर्व अभ्यासक्रम**

**एकात्मिक संभाषणात्मक पद्धतीने पद्धतशीर मराठी शिकू इच्छिणाऱ्या अमराठींसाठी 'माय मराठी'च्या एका संचात पाठ्यपुस्तक, अभ्यासपुस्तिका आणि विनामूल्य दृक्श्राव्य डीव्हीडी यांचा समावेश आहे.**




**प्रकल्प समन्वयक**
विभा सुराणा
दीपक पवार

**लेखक**
सुहास लिमये
जयवंत चुनेकर

**ग्रंथाली**

वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, तळमजला, जे.के.सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ • दूरध्वनी :(०२२) २४२१६०५० / २४३०६६२४

granthali01@gmail.com / granthali02@gmail.com • website : www.granthali.com

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

**ऑगस्ट २०१४, वर्ष दुसरे**
**अंक चौथा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ व आतील मांडणी : **सतीश खानविलकर**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**शब्द रुची/पुस्तक वितरण – महेश गोरेगांवकर**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी १०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ.'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, बुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.**

## संपादकीय...

सचिन तेंडुलकर मैदानात उतरला की तो तारणहार असतो. गरज आहे तेव्हा तर तोच शतकी खेळी करणार हे गृहीतच धरलेलं असतं. असं गृहीत धरणं एखाद्या बॉलरबाबत होत नाही. त्याच्याकडून धावांची पूर्तता होईलच असं नसल्यानं ते होतं. हे घडतं त्या त्या व्यक्तीच्या सिद्ध कर्तृत्वामुळे. यात श्रद्धा–अंधश्रद्धा यांची सीमारेषा पुसट असते. नकळत अंधश्रद्धाच जोपासली जाते. आश्चर्याची बाब म्हणजे हे वैज्ञानिक विश्वात काम करणाऱ्यांबद्दलही घडतं. भारतीय परम संगणकाचे जनक विजय भटकर यांनी अतिंद्रिय शक्तीचा अनुभव घेतला आहे, असं ते सांगतात, विविध शक्यता अजमावण्याच्या प्रयत्नांत ते प्लँचेट प्रकरणालाही अनुकूलता दर्शवतात असं , तिथे जनसामान्यांची काय कथा! इथे प्रश्न असतो मानसिकतेचा आणि विवेकाचा. अन्यथा, डॉ. दाभोलकरांचे खुनी न सापडल्यानं आधीच हवालदिल पोलिसखातं आणि गृहखातंही प्लँचेट प्रकारानं 'पोळ'तं! त्यामागे वैफल्य अधिक असलं तरी हा मार्ग अनाकलनीयच आहे. माणसातला विवेक जागवण्याचाच प्रयत्न डॉ. दाभोलकर करत आले. मात्र त्यांच्या हत्येला वर्ष होऊनही खुनी सापडतच नाहीत हे जितकं दुर्दैवी आहे, तितकंच कायद्याच्या रक्षकांमध्येच अंधश्रद्धा असल्याचं उघड होणं खेदजनक आहे. मग प्रश्न पडतो तो पुरोगामीत्व म्हणजे भौतिक जीवनात (सिव्हिलायझेशन) उत्पन्न होणाऱ्या सुखसोयी का? संस्कृती (कल्चर) कुठे बदलली? जगभर हेच पाहायला मिळतं. ज्यांचा समाजावर प्रभाव आहे असे अधिकांश नेते, अभिनेते, खेळाडू बुवा–बाबा, अघोरी शक्ती यांच्यावर विसंबतात तेव्हा मोजक्या विवेकी विचारवंतांकडे दुर्लक्ष होतं. 'आधुनिक' होताना अंधश्रद्धाही विकसित होतात, पसरतात हे वास्तव आहे. अपर्णा पाटील यांनी याचा चांगला ऊहापोह आपल्या लेखात केलाय.

सुधीर थत्ते, डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, आल्हाद गोडबोले, डॉ. अनंत लाभसेटवार, रमेश दिघे, प्रभाकर वाईरकर, श्रीकांत पेटकर यांचे विज्ञान, विचार, राजकारण, व्यक्तिमर्म सांगणारे अन्य लेखही वाचनीय आहेत.

पुढला अंक 'पर्यावरण विशेषांक' आहे. त्याचं संपादन शुभदा पटवर्धन करणार आहेत.

**– अरुण जोशी**

# ईश्वरी इच्छा आणि सैतानी ताकद

## अपर्णा पाटील

**डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या हत्येला एक वर्ष झालं, पण अद्याप त्यांच्या मारेकऱ्यांचा पत्ता लागलेला नाही. उलट गेल्या काही दिवसांत त्यांच्या मृत्यूला जबाबदार कोण हे शोधण्यासाठी त्यांच्याच आत्म्याला बोलावणारं प्लँचेटचं वादग्रस्त प्रकरण घडलं. ज्या दाभोलकरांनी आपलं आयुष्य अंधश्रद्धा दूर करण्यासाठी वेचलं, त्यांच्या मृत्यूनंतर ओढवलेलं हे प्रकरण खेद वाटायला लावणारं आहे. भारतातच असं घडतंय, असं म्हटलं तर मात्र ते चुकीचं ठरेल. अगदी अमेरिकेत रोज अशा घटना घडत आहेत, ज्यामुळे भूत, बळी, आत्मे यांचे रोज नवे पुरावे सादर होताहेत.**

**श्रद्धा** आणि अंधश्रद्धा या माणसाच्या इतिहासाइतक्याच जुन्या आहेत. जगभरातील कोणत्याही देशात या दोन्ही गोष्टी नाहीत, असं होऊच शकत नाही. धर्म, वंश वेगवेगळे असले तरी श्रद्धा आणि अंधश्रद्धांपासून माणसाला वेगळं काढणं कठीणच. जगात अशा अनेक गोष्टी घडतात, ज्या घडण्याची कारणंही अतर्क्य असतात. अशावेळी अशा घटनांचा संबंध थेट सैतानी ताकद किंवा ईश्वरी शक्तींशी लावण्याची वृत्ती सर्वसामान्यपणे सर्वत्र आढळून येते. माणूस शिकला, त्याचा पेहराव बदलला, त्याचा दृष्टिकोन विकसित होत गेला, तो सुधारणावादी, बंडखोर झाला तरीही त्यातल्या श्रद्धा आणि अंधश्रद्धांनी त्याची साथ सोडलेली नाही. मांजर आडवी गेली तरी काही होत नाही, असं मानणारे खूप जण असतील; पण तरी त्यांच्यातल्या अंधश्रद्धांना मात्र अद्याप तडे गेलेले नाहीत.

आधुनिक जगात या समजुतीची अनेक भयावह रूपं पाहायला मिळतात. ज्या डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी अंधश्रद्धेचं उच्चाटन व्हावं यासाठी तळमळीनं काम केलं, त्यांचेच मारेकरी शोधण्यासाठी प्लँचेटसारख्या गोष्टीचा वापर झाला. मुंबईसारख्या विकसित शहरातही धनलोभापायी मानवी बळी देणं, नवस, गंडेदोरे, वशीकरण, तंत्रमंत्र अशा गोष्टींचे भुलावे पावलोपावली पाहायला मिळतात. तर दुसरीकडे अंतराळात उपग्रह पाठवून देशाच्या प्रगती आणि विकासात महत्त्वाचं पाऊल टाकणाऱ्या संशोधक मंडळींचं पूजापाठ करवून घेणं, ही बाब लपून राहत नाही. श्रद्धा-अंधश्रद्धांची ही दोन रूपं नाही म्हणायला आपल्यालाही आपल्या जगण्याचा भाग वाटतात, हे अनाकलनीय पण वास्तव आहे.

एखाद्या देवाला जाणं, एखादी अंधश्रद्धा पाळणं या गोष्टी आपल्या रोजच्या जीवनाचा भाग झाल्या. पूर्वी या दोन्ही गोष्टी लोक आपल्या घरापुरत्या, वैयक्तिक आयुष्यापुरत्या सीमित ठेवत होते, आता मात्र त्याचं उघड प्रदर्शन व्हायला लागलं आहे. राजकीय नेते आणि सेलिब्रिटीजनं त्याचं प्रदर्शन मांडायला सुरुवात केल्यानंतर तर श्रद्धा की अंधश्रद्धा असा मुद्दा बाजूला पडला आहे. एखाद्या अभिनेत्यानं मंदिरात पायी चालत जाणं असो नाहीतर एखाद्या चमत्कारी गुरूची आराधना करणं असो, या गोष्टींबाबत आपल्याला आता फार वावगं वाटत नाही. लोकप्रिय कलाकारांनी टीव्हीवरून नजरकवच, मंत्र-तंत्राची सामुग्री यांचा व्यापार मांडणं आता लोकांना खटकत नाही. अशी उदाहरणं केवळ भारतातच घडतात असं म्हणता येत नाही. परदेशातही आता श्रद्धा-अंधश्रद्धांचा उघड बोलबाला होऊ लागला आहे. त्यात हॉलिवूडचे कलाकार आणि जगभरातील राजकीय नेते आहेत. विशेष म्हणजे गेल्या काही वर्षांत भारतातील कलाकार आपल्या सिनेमाच्या रिलीजच्या आधी वेगवेगळ्या मंदिरांत जातात, त्याचं उघडपणे प्रदर्शन करायला लागलेत. त्याविषयी सुरुवातीला नाराजी होती, पण आता तर मोठ्या प्रमाणावर त्याचं अनुकरण होऊ लागलं आहे. पुढारी निवडून आले की लगेच मंदिरांमध्ये

बोटं मुडपून पोझ दिलेले बिल क्लिंटन



धाव घेतात. त्यांचे गुरू कोण याविषयी उघडपणे बोलतात, तेव्हा सर्वसामान्य माणसंही अशा मठ, मंदिरांकडे धाव घेतातच. किमान भारतीय नेते, अभिनेते हे देव, गुरूच्या आराधनेत मग्न झाले आहेत, पण हॉलिवूडमधले अभिनेते, ब्रिटन, इटली, अमेरिकेतले नेते मात्र सैतानी शक्तींची आराधना करत असल्याची उघड चर्चा होऊ लागली आहे.



मॅडोना

देवाची आराधना करणं किंवा सैतानाची उपासना या गोष्टी पूर्वी व्यक्तिगत बाबी मानल्या जात होत्या. किंबहुना त्याचा सार्वजनिक जीवनात फार उच्चारही होत नसे. पण आता जशी देवाची पूजा करून आपल्या इच्छा पूर्ण होतात, तशी सैतानाची आराधना करून आपल्याला हवं ते मिळवता येतं, असं खुलेआम बोललं जाऊ लागलं आहे. विशेषतः अमाप लोकप्रियतेसाठी सैतानाची आराधना केली जाते, या म्हणण्यात तथ्य असल्याचं सांगण्यासाठी अनेकजण सरसावले आहेत.

हॉलिवूड किंवा अमेरिका-इंग्लडमधल्या कलावंतांविषयी असं बोललं जातं की आपल्याला प्रसिद्धी, पैसा मिळावा यासाठी सैतानाची आराधना करतात. सैतान त्यांना हवी तेवढी लोकप्रियता देतो, मात्र त्या बदल्यात त्यांचं आयुष्य मागतो. त्यामुळेच हॉलिवूडमधले अनेक कलावंत अल्पायुषी ठरल्याचं सांगितलं जातं.

गायकांच्या बाबतीत तर हा समज छातीठोकपणे सांगितला जातो. अगदी सुमार दर्जाच्या गायकांना अचानकपणे मिळालेल्या लोकप्रियतेमागे अशीच सैतानी ताकद असल्याचं सांगितलं जातं. त्यासाठी रॉबर्ट जॉन्सनचं उदाहरण दिलं जातं. साठच्या दशकात अनेक कलावंत गायक-वादक म्हणून नाव मिळवण्यासाठी धडपडत होते. जॉन्सनही त्यांपैकी होता. तो काही फार चांगला गिटारवादक नव्हता. त्यामुळे यश मिळणं त्याला अवघड झालं होतं. पण एका रात्री त्याला मोठ्या काळ्या आकारातला सैतान रस्त्यावर भेटला. त्यानं त्याच्याकडची गिटार घेतली, ती ट्युन करून त्याला परत दिली. त्या बदल्यात त्या सैतानानं त्याच्याकडून त्याचा आत्मा मागितला. त्या घटनेनंतर रॉबर्ट त्या गिटारच्या जोरावर खूप लोकप्रिय झाला, पण काही वर्षांतच त्याच्यावर विषप्रयोग करून गोळ्या घालण्यात आल्या होत्या.

मायकेल जॅक्सन



रॉबर्टच्या संदर्भातली ही कथा अनेक संगीतकारांना हव्याहव्याशा यशासाठी खरी वाटायला लागली. आपल्याला यश मिळावं यासाठी अनेक कलाकार सैतानाची आराधना करत होते. रोलिंग स्टोन्स या जगप्रसिद्ध बँडचा प्रमुख आणि प्रख्यात गिटारवादक ब्रायन जोन्सही अशा गूढ विद्यांमध्ये रमलेला असायचा, असे उल्लेख त्यांच्या चरित्रात आले आहेत. अनेक कलाकार आपल्या शोपूर्वी सैतानी शक्तींसाठी विशेष विधी पार पाडायचे. त्यामुळेच यश आणि लोकप्रियतेच्या बदल्यात स्वतःच्या आयुष्याचा सौदा ही मंडळी करतात, अशी कल्पना खरीच असल्याचा समज अनेकदा खरा वाटू लागला. त्याचे पुरावे शोधण्याची खोडही अनेकांना लागली.

फिलीप सेमोर हॉफमन या हॉलिवूडमधल्या अभिनेत्याचं याच वर्षी फेब्रुवारीत निधन झालं. आपल्या अभिनयशैलीमुळे लोकप्रियतेच्या लाटेवर आरूढ झालेल्या या अभिनेत्याच्या निधनानंतर भलत्याच चर्चांना प्रसिद्धी मिळत राहिली. खरं तर फिलीप सेमोर हॉफमन हे बऱ्याच काळापासून अंमली पदार्थांच्या व्यसनानं उद्भवलेल्या व्याधींनी त्रासलेले होते. त्यामुळे त्यांच्या निधनाबाबत धक्का बसणं साहजिक असलं तरी अनपेक्षित नव्हतं. तरीही त्यांच्या निधनाच्या खऱ्या कारणापेक्षा चर्चा झाली ती सैतानी ताकदीशी हॉफमन यांच्या कथित कराराशी. हॉफमन हे सैतानाची आराधना करत होते, त्यामुळेच ते अल्पावधीत गेले, असं म्हणणं मांडलं गेलं, तर त्यांच्या व्यसनाधीनतेसाठी देवानं त्यांना शिक्षा केली असं म्हटलं गेलं.

सिक्रेट सोसायटी, कबाला, सायन्टोलॉजी या सगळ्या गोष्टी केवळ हॉलिवूडमधल्या कलाकारांच्या गॉसिप्समुळेच भारतातल्या छोट्याशा शहरांपर्यंत उत्सुकतेचा विषय ठरल्या आहेत. मॅडोनासारखी गायिका कबालाची उपासक असल्याचं म्हटलं जातं. पण कबाला म्हणजे नेमकं काय हे अनेकांना नीटपणे सांगता येत नाही. तिच्या हातात काळा दोरा असतो. कबालाला ती दरवर्षी भेट देते. हॉलिवूडचा देखणा अभिनेता टॉम क्रुझ या सायन्टोलॉजीला मानतो. त्याची पत्नी कॅटी होम्स हिच्याशी त्याचं विभक्त होणं हा सायन्टोलॉजीला न मानण्याचा परिणाम आहे, असं म्हटलं जातं. हॉलिवूडमधील अत्यंत लोकप्रिय अभिनेते सायन्टोलॉजीला मानतात. तर भारतातील

काही कलावंतही याचे सभासद आहेत. जॉन ट्रॅव्होल्टासारखा अभिनेताही सायन्टोलॉजीला मानतो. प्रत्यक्षात ही गोष्ट काय याची फारशी माहिती आपल्याकडे मिळत नसली तरी त्याविषयी गूढ वाढलंय.

काही वर्षांपूर्वी दा विंची कोड नावाची कादंबरी लोकप्रिय झाली. येशू ख्रिस्ताची वंशपरंपरा गुप्तपणे जतन करण्यासाठी काही मंडळी काम करतात, त्यांची एक गुप्त संघटना आहे अशा गृहितकावर आधारित ही कादंबरी. मायकलअँजेलोपासून अनेक कलावंताच्या कलाकृतींत येशू ख्रिस्ताचा वंश जपण्यासाठी एक सिक्रेट सोसायटी कशी काम करतेय, अशी त्या कादंबरीची मध्यवर्ती कल्पना आहे. लेखक डॅन ब्राऊन अशा कल्पना आपल्या पुस्तकातून अशा काही रंगवतो, की खरंच असं काही आपल्या बाजूला अस्तित्वात असावं, यावर तो विश्वास ठेवायला भाग पाडतो.



दोन बोटं मुडपून पोझ दिलेले बराक ओबामा

तीनदा सहा म्हणजे सैतानाची पूजा असं पाश्चात्यांमध्ये मानलं जातं किंवा हाताची मधली दोन दोन बोटं मुडपणं म्हणजेही सैतानी ताकदीवर विश्वास असल्याचं प्रतीक मानलं जातं. हे खरं आहे हे सांगणारे पुरावे इंटरनेटवर आहेत. आपण व्हॉट्स ॲपवर 'छान' असं म्हणण्यासाठी जी साइन (प्रतीक) वापरतो, ती म्हणजे प्रत्यक्षात तीन सहा असल्याचं मानलं जातं. म्हणजे चक्क सैतानी ताकदीवर आपला विश्वास असल्याचं त्यातून मानतो, असं हे प्रतीक सांगतो. किंवा यो... असं म्हणत आपण आपल्या हाताची मधली दोन बोटं मुडपणं ही सहज क्रिया करणं असेल, पण पाश्चात्यांच्या जगात त्याला सैतानी ताकदीला मान्य करणं असं मानलं जातं.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांचं अख्खं कुटुंब सैतानाची उपासना करतं, असं मानलं जातं. त्यासाठी त्यांच्या कुटुंबातील प्रत्येक सदस्याची दोन बोटं मुडलेली छायाचित्रं पुरावे म्हणून सादर केली जातात. बिल क्लिंटन, अमेरिकेतील नेत्या सारा पालिन यांचीही तशी छायाचित्रं आहेत. इतकंच नाही, तर बराक ओबामा यांनीही तशी पोझ दिल्याचं छायाचित्र आहे. खरं यात काही तथ्य नाही, असं आपणं म्हणू शकतो. पण या दाव्यात असं म्हटलंय, की जर बराक सैतानी शक्तींना मानत नसते तर राष्ट्राध्यक्ष झालेच नसते. कारण केनियात जन्मलेल्या एका माणसाला अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष होण्याची संधी कधीच मिळू शकली नसती.

तीनदा सहा म्हणजे सैतानाची पूजा!




इतकंच नाही तर 'द बिटल्स' या जगविख्यात गायकांच्या बँडबाबतही असाच दावा केला जातो. त्यासाठी एका छायाचित्राचा आधार घेतला गेलाय. त्या फोटोत सर पॉल मॅकार्टनी मुडपलेल्या बोटांचं चिन्ह तर जॉन लेनन तीन सहा हा आकडा दाखवत आहेत. मॅडोना, लेडी गागा, बियॉन्से, ग्वेन स्टिफनी, जस्टिन टिंबरलेक अशा कित्येक गायकांनी आपल्या फोटोतून तीन सहा हा आकडा दिसेल अशा पोझ दिल्या आहेत. रिहानासारख्या तरुण गायिकेनंही आपण सैतानाची पूजा करतो असं जाहीर केलंय. या सगळ्यांना हव्या असलेल्या लोकप्रियतेसाठी ही आराधना केल्याचं म्हटलं जातं. कलावंत, राजकारणी यांचा पगडा सर्वसामान्यांवर मोठ्या प्रमाणावर असतो. त्यामुळे त्यांच्यासारखं यश आपल्यालाही मिळो यासाठी अनेक जण सैतानाची आराधना कशी करतात यासाठी शोधाशोध करत आहेत. आपल्याला हे ऐकणं आणि त्यावर विश्वास ठेवणं हे सगळं हास्यास्पद वाटत असलं तरी एक मोठी फौज अशा कामाला लागली आहे.

माणूस विज्ञानाची कास धरतो, म्हणजे तो प्रगत होण्याच्या मार्गाला लागतो. पण देव, धर्म, श्रद्धा या गोष्टींपासून त्याला दूर होणं जमत नाही. माझी देवावर श्रद्धा आहे, पण मी कर्मकांडाला स्थान देत नाही, असं म्हणणारेही आहेत. ही अपरिहार्यता त्यांना कधी देव तर कधी सैतानाची आराधना करायला भाग पाडत असते. त्यातली अंधश्रद्धा ओळखण्याची बुद्धी मानवाला झाली तर प्लँचेटसारखे प्रकार टळतील.

**– अपर्णा पाटील**
प्लॉट नं. ६०० (१०१),
गिरिजा अपार्टमेंट, खेर सेक्शन,
अंबरनाथ (पूर्व) ४२१५०१
aparna.patil1@gmail.com

# शांततामय सहअस्तित्वाची परीक्षा...

**आल्हाद गोडबोले**



**पंडित जवाहरलाल नेहरू आणि चीनचे पंतप्रधान झाऊ-एन-लाय यांच्यात एप्रिल १९५४ मध्ये बांडुंग येथे 'पंचशील करार' झाला.**

**सदुसष्ठाव्या** स्वातंत्र्यदिनानिमित्त चौदावे पंतप्रधान नरेंद्र दामोदरदास मोदी १५ ऑगस्ट रोजी दिल्लीच्या लाल किल्ल्यावरून देशाला उद्देशून पहिले भाषण करतील. मोदींच्या पंतप्रधानपदाच्या कारकिर्दीतील हा एक लक्षणीय टप्पा मानावा लागेल. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून पंतप्रधानांच्या या भाषणाला ऐतिहासिक महत्त्व आणि परंपरा लाभली आहे. पण लोकसभेची पाच वर्षांची मुदत पूर्ण करू शकलेले आणि सलग पाच वेळा लाल किल्ल्यावरून स्वातंत्र्यदिनाचा संदेश दिलेले पंतप्रधान बोटांवर मोजता येतील एवढेच आहेत. पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी, पी. व्ही. नरसिंह राव आणि मनमोहनसिंग कोहली या पाच काँग्रेस नेत्यांखेरीज एकाच बिगर काँग्रेस नेत्याला हे भाग्य लाभले, ते अटलबिहारी वाजपेयी यांना.

एकेकाळचा जनसंघ, स्वतंत्र पक्ष, समाजवादी पक्ष, जनता दल किंवा काँग्रेसच्या वेगवेगळ्या फळ्या वगैरे यापैकी कोणीच काँग्रेसला पर्याय देऊ शकत नाहीत, हे पन्नास वर्षांच्या निवडणुकीच्या राजकारणातून जणू सिद्ध होत होते. अकराव्या अल्पजीवी लोकसभेपाठोपाठ १९९९च्या निवडणुकीत पुन्हा पंतप्रधानपदी आलेले वाजपेयी मात्र सलग पाच वर्षे सत्तेवर राहून बाराव्या लोकसभेची मुदत पूर्ण करू शकले. असा अपवाद घडवणारा पहिला काँग्रेसेतर पक्ष अशी नोंद यामुळे भारतीय जनता पक्षाच्या नावावर झाली, तरी हा लौकिक निर्विवाद नव्हता, कारण वाजपेयी हे फक्त भाजप नव्हे, तर भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सरकारचे नेतृत्व करत होते आणि त्यात तब्बल दोन डझन पक्ष सहभागी होते.

सोळाव्या लोकसभेचे नेतृत्व करणाऱ्या मोदींचे सरकारही असेच दोन डझन पक्षांच्या आघाडीचे आहे. पण त्यात एक महत्त्वाचा फरक आहे, तो म्हणजे, त्यात एकट्या भाजपचे ५४३ पैकी २८० सदस्य आहेत, म्हणजेच या पक्षाचे निर्विवाद बहुमत आहे. थोडक्यात मोदी सरकारवर कोणी पाठिंबा काढून घेण्याची, ते पडण्याची टांगती तलवार राहणार नाही. अशा प्रकारे मतपेटीच्या माध्यमातून स्थिर सरकारची हमी मिळालेले हे पहिले काँग्रेसेतर सरकार आहे. काँग्रेसला पर्याय फक्त आपणच देऊ शकतो, हे जणू सिद्ध करण्याची, १९८० मध्ये स्थापना झाल्यापासूनची, भाजपची महत्त्वाकांक्षा ३४ वर्षांच्या राजकीय वाटचालीनंतर पूर्ण होते आहे.

योगायोग असा, की मोदींनी पंतप्रधानपदाची शपथ २६ मे रोजी घेतली, त्याच्या दुसऱ्याच दिवशी - २७ मे रोजी -




**पंचशील कराराची तत्त्वं कोरलेली शिला**

नेहरूंची पन्नासावी पुण्यतिथी होती. वल्लभभाई पटेल काँग्रेसचेच असले तरी 'गुजरात'चे होते, तसेच नेहरूंशी त्यांचे मतभेद होते, असा डंका पिटवून ते 'बिगरकाँग्रेसी' असल्याचा भरपूर प्रचार केला गेला असल्याने भाजपचे नेते पटेलांचा वारसा सांगतात आणि अर्थात 'पोलादी पुरुषा'प्रमाणे 'विकास पुरुष' म्हणून नावाजलेले मोदी स्वतःला पटेलांचे वारस मानतात. भाजपला नेहरू-गांधी घराण्याचे वावडे आहे आणि भारताच्या इतिहासातून नेहरूंच्या वारशाचा प्रभाव पुसण्याची मनीषा या पक्षाला आहे, हे काही गुपित नाही. साहजिकच नेहरूंच्या पश्चात पन्नास वर्षे टिकून राहिलेला नेहरूंचा वारसा मोदी राजवटीत बाजूला सारला जातो का, हा कुतूहलाचा विषय असेल.

राजकारणात कशाचाच भरवसा नसतो, हे खरे असले तरी, वाजपेयींप्रमाणे मोदी लोकसभेची मुदत पूर्ण करू शकतील, असे या घटकेला तरी बहुतेक सारेचजण मानतात. त्यामुळे त्यांच्या कारकिर्दीचे मूल्यमापन अवघ्या अडीच महिन्यांच्या अनुभवांवरून करण्याचे कारण नाही. २०१९ च्या निवडणुकीत जवळजवळ १०० कोटी मतदार ते करतीलच. पण या वाटचालीत मोदींपुढे कोणती आव्हाने उभी राहू शकतील आणि मोदींकडे त्यावर कोणती उत्तरे असतील, याचे आडाखे गेल्या दोन-अडीच महिन्यांतील घडामोडींवरून बांधता येतील.

लालकृष्ण अडवाणी, जसवंत सिंह , मुरली मनोहर जोशी, यशवंत सिन्हा यांच्यासारख्या बुजुर्गांना अडगळीत टाकून, पण 'उपयुक्तते'च्या निकषावर सुषमा स्वराज, उमा भारती अशा महिला नेत्यांना चुचकारत आणि पक्षाध्यक्षापासून राज्यपालपदांपर्यंत आपल्या मर्जीतील, विश्वासातील नेत्यांच्या नेमणुका करत मोदींनी अंतर्गत व्यवस्थेवर सुरुवातीपासूनच पकड ठेवली. परदेशदौऱ्यावर असताना देशात होणाऱ्या वरिष्ठ पातळीवरील बैठकांमध्ये आपली खुर्ची भले रिकामी राहिली तरी चालेल, पण हंगामी पदभारही कुणावर न सोपवण्याचा आणि 'दुसऱ्या क्रमांका'च्या नेत्याला किंबहुना 'भावी स्पर्धका'ला तूर्ततरी अंतरावर ठेवण्याचा धूर्तपणा मोदींनी दाखवला. जनरल व्ही. के. सिंगसारख्या वादग्रस्त निवृत्त लष्करप्रमुखाकडे संरक्षणासारख्या खात्याचे कॅबिनेट मंत्रिपद द्यावे की नाही अशा द्विधा मनःस्थितीमुळे असेल कदाचित, पण त्याचा 'अतिरिक्त' भार अर्थमंत्री अरुण जेटली यांच्यावर सोपवून एक अप्रिय निर्णय मोदींनी पुढे ढकलला. याउलट टेलिकॉम नियंत्रण अधिकरणाचे माजी अध्यक्ष नृपेंद्र मिश्र यांची पंतप्रधानांचे प्रधान सचिव या मोक्याच्या जागेवर वर्णी लावण्यात कायद्याचा अडसर येत असल्याने थेट कायद्यात दुरुस्ती करणारे विधेयकच संसदेच्या दोन्ही सभागृहांकडून संमत करवून घेण्याचे धाडस मोदींनी दाखवले. तसेच, स्वतंत्र भारताने स्वीकारलेल्या मिश्र अर्थव्यवस्थेपासून गेल्या दोन तपांच्या आर्थिक उदारीकरणाच्या धोरणातही टिकून राहिलेल्या नियोजन मंडळासारख्या यंत्रणा मोडीत काढण्याच्या रोखाने पावले उचलली .

'घरच्या आघाडीवरील' म्हणाव्यात अशा या काही घटना. पण शपथविधी समारंभास 'सार्क'मधील शेजारी राष्ट्रांच्या प्रमुखांना निमंत्रित करण्यापासून 'ब्रिक्स' शिखर परिषदेत संकल्पित बँकेचे पहिलेच अध्यक्षपद भारताकडे आणण्यापर्यंत किंवा पंतप्रधान या नात्याने पहिल्याच परदेशभेटीसाठी भूतानची निवड करण्यापासून इराकमध्ये अडकलेल्या ४६ परिचारिकांना सुखरूप मायदेशी परत आणण्यापर्यंत मोदींनी आपली राजकीय हुशारीही आंतरराष्ट्रीय पातळीवर दाखवून दिली, असे म्हणता येईल. मोदींचे नशीब असे, की ज्या अमेरिकेने २००२ मधील दंगलीतील संशयास्पद भूमिकेचा ठपका ठेवून मोदींना व्हिसा नाकारला होता, त्याच अमेरिकेला, मोदींचे पंतप्रधानपद निश्चित होताच 'सन्माननीय पाहुणे' म्हणून सर्वात प्रथम भेटीचे निमंत्रण देऊन त्यांच्यासाठी 'रेड कार्पेट' अंथरण्याची तयारी करावी लागते. २१ देशांच्या सहभागातून साकारलेल्या 'आशिया पॅसिफिक संघटने'चे निमंत्रण यापूर्वी नरसिंह राव - वाजपेयी - मनमोहनसिंग यांनादेखील मिळालेले नसताना थेट चीनचे अध्यक्ष झी जिनपिंग यांच्याकडून मोदींसाठी या संघटनेचे दरवाजे उघडले जातात. पाश्चिमात्य जगाच्या भुवया उंचावल्या जाव्यात अशी ही काही उदाहरणे. पण ही सुरुवात आहे आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर मोदींचे कसब, चातुर्य पणाला लागावे किंवा त्यांच्या परराष्ट्रधोरणाची कसोटी लागावी, असे अजूनतरी काही घडलेले नाही. त्यासाठी आगामी पावणेपाच वर्षांचा भरपूर मोठा कालावधी बाकी आहे .

मात्र भारताच्या दृष्टीने सर्वात कळीचा मुद्दा ठरेल, तो पाकिस्तानपेक्षाही भारत-चीन संबंधांना मोदी राजवटीत कसे वळण लागते ते पाहण्याचा. ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या पाच उदयोन्मुख आर्थिक सत्ता मानल्या जातात. त्यांच्या 'ब्रिक्स' संघटनेच्या माध्यमातून भारत आणि चीन या

शक्ती जवळ येत आहेत, असे सध्याचे तरी चित्र आहे. अर्थात त्यात उभयतांतील सीमातंट्याचा अडथळा आहेच, पण तो सामंजस्याने सोडवून किंवा निदान प्रत्यक्ष नियंत्रणरेषा निश्चित करून; वाद बाजूला ठेवून, उभयतांनी आर्थिक, व्यापारक्षेत्रात सहकार्य वाढवले तर जागतिक अर्थव्यवस्थेचा तोल बदलू शकतो. मोदींना याचे भान असावे, असे वाटते. १९८८ मध्ये कैलास-मानसरोवर यात्रा केलेल्या आणि गुजरातचे मुख्यमंत्री असताना चार वेळा चीनला भेट देऊन आलेल्या मोदींनी मात्र 'नेहरू की पटेल' अशा वादात पडण्यापेक्षा भारत-चीन संबंधांचा इतिहास नीट अभ्यासणे आणि पुढे जाणे, ही काळाची खरी गरज ठरणार आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका आणि रशिया या दोन सत्तांमध्ये जागतिक वर्चस्वासाठी संघर्ष सुरू झाला. जास्तीत जास्त देशांना आपल्या प्रभाव-वर्तुळात आणण्याची रस्सीखेच वाढत जाऊन जगाची जणू दोन गटांत विभागणी होऊ पाहत असतानाच आशिया आणि आफ्रिका खंडांतील अनेक देश वसाहतवादाच्या जोखडातून मुक्त होत स्वतंत्र झाले. त्याचवेळी भारतही दक्षिण आशियातील नवी, अप्रगत पण विकसनशील शक्ती म्हणून उदयास येत होता. अशा वेळी अमेरिका आणि रशिया यांच्यातील शीतयुद्धाला आणि सत्तासंघर्षाला आळा घालणाऱ्या अलिप्ततेच्या धोरणाची कास नेहरूंनी धरली आणि इजिप्तपासून इंडोनेशियापर्यंत अनेक देशांना बरोबर घेऊन अलिप्त राष्ट्रांची चळवळ उभी केली.

जागतिक शांतता हे अलिप्तता धोरणाचे महत्त्वाचे तत्त्व होते. चँग कै शेक यांची राजवट उलथवून माओ झेडाँग यांच्या नेतृत्वाखाली, शेजारच्या चीनमध्ये १९४८ मध्ये, साम्यवादी राजवट प्रस्थापित झाली आणि पाठोपाठ त्यांच्या लाल सेनेने - इंग्रजांनी आपल्या कारकिर्दीत 'बफर स्टेट' म्हणून उभ्या केलेल्या- तिबेटवरही कब्जा मिळवला. त्याआधीच्या अर्धशतकात इंग्रजांनी तिबेटबरोबर करार करून तिबेटचे दळणवळण, संरक्षण आणि परराष्ट्रधोरणही आपल्या नियंत्रणाखाली आणले होते. तिबेटबरोबर व्यापार सुरू ठेवताना हा वारसा स्वतंत्र भारताकडे आला होता. पण साम्यवादी चीनच्या उदयानंतर भूगोलच बदलला. देशांतर्गत घडी बसवण्यास प्राधान्य देणे आवश्यक असल्याने इतिहास नाकारून शेजाऱ्यांचे संरक्षण करणे स्वतंत्र भारतास शक्य नव्हते आणि अलिप्त राष्ट्र चळवळीचे नेतृत्व करत असताना संघर्षाचा बिगूल वाजवणे विसंगतही ठरले असते. एका तत्त्वाचा अंगीकार करताना नेहरू नकळत स्वत:च निर्माण केलेल्या सापळ्यात अडकले. माओ आणि चौ एन लाय यांच्या साम्यवादी नवचिनी राजवटीला मान्यता देण्यात पुढाकार घेण्यापासून चीनला संयुक्त राष्ट्रसंघाचे दार उघडण्यापर्यंत आणि १९५४ मध्ये पंचशील करार करण्यापर्यंतच्या घडामोडी म्हणजे नेहरूंच्या या कसरतीचा इतिहासच आहे. तिबेटवरील चीनचा दावा मान्य करून, पंचशील करार करताना, दक्षिण आशियातील संघर्ष टाळण्याचा आणि 'शांततामय सहअस्तित्व' या तत्त्वाचा पुरस्कार जागतिक पातळीवर करण्याचाच नेहरूंचा हेतू होता. तिबेटचे संरक्षण-परराष्ट्र धोरण चीनच्या हवाली करून

**भारत-चीन यांच्यातील थांबलेला व्यापारही तब्बल चाळीसहून अधिक वर्षांनी, २००६ मध्ये सिक्कीममधील नथु ला खिंडीतून तो पुन्हा सुरू झाला.**



## ग्रंथालीची ताजी प्रकाशने...




**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**

# डॉ. मनमोहनसिंग

## एक वादळी पर्व

## सुजय शास्त्री

नरसिंह राव सरकारात १९९१ साली डॉ. मनमोहनसिंग यांची अर्थमंत्री म्हणून झालेली निवड अनपेक्षित ठरली. मात्र त्यानंतर त्यांनी केलेल्या आर्थिक सुधारणा आणि उदारीकरणाची धरलेली कास यामुळे आर्थिक अरिष्टातून देश सावरला. जनतेच्याच नाही तर माध्यमांच्या लेखीही ते नव्या अर्थनीतीचे शिल्पकार म्हणून गौरवले गेले. पुढे, २००४ साली तितक्याच अनपेक्षितपणे डॉ. मनमोहनसिंग यांची पंतप्रधानपदासाठी निवड झाली. त्या दरम्यानच्या राजवटींनी त्यांची धोरणेच पुढे चालवली होती. दोनदा पंतप्रधानपद नाकारून सोनिया गांधी यांनी टाकलेली जबाबदारी ते पार पाडत होते...

...आणि त्यांच्या विरोधात काहूर माजू लागले. विविध घोटाळ्यांचे भांडवल उभारून त्यांना बदनाम करायला सुरुवात झाली. न बोलणारा कमकुवत पंतप्रधान अशी अजब बडबड विरोधक करू लागले. अण्णा हजारे, केजरीवाल यांच्या आंदोलनांनी देश ढवळला. माध्यमांनीही त्याला खतपाणी घातले. यामागे नेमके काय होते? डॉ. मनमोहनसिंग यांच्या त्या दहा वर्षांच्या वादळी कारकिर्दीचा हा पट...

# दृष्टीपलीकडील सृष्टी

## उमेश कदम

आफ्रिका – एक अगम्य आणि अद्‌भुत खंड! तेथील जनता शतकानुशतके हिंसाचाराने व अत्याचाराने गांजलेली नि गूढ चालीरीतींच्या दुष्ट चक्रात गुरफटलेली. आजही तेथील कित्येक रहिवाशांचा चेटूक, करणी, पिशाच्चबाधा, मंत्र–तंत्र, जादूटोणा नि चमत्कार यांच्यावर विश्वास आहे व त्यामुळे ते कर्मकांड व बुवाबाजीच्या आहारी गेले आहेत, हे लेखकास सहा वर्षांपूर्वी आफ्रिकेस स्थलांतर केल्यानंतर प्रकर्षाने जाणवले. 'दृष्टीपलीकडील सृष्टी'मध्ये आहेत आफ्रिकेतील अंधश्रद्धांच्या अमानुष विळख्याची व्याप्ती आणि निष्पत्ती सिद्ध करणाऱ्या बारा मनोरंजक सत्यकथा. त्यातील काही आहेत चकित नि अस्वस्थ करणाऱ्या तर काही भयावह नि अंगावर शहारे आणणाऱ्या. त्यांच्या माध्यमातून लेखकाने आफ्रिकी मानसिकतेचा शोध घेतला आहे व तो साध्या, सोप्या नि उत्कंठावर्धक शैलीत सादर केला आहे. अंधश्रद्धांनी निर्मिलेली मानसिक गुलामगिरी – मग ती जगाच्या कोणत्याही भागातील असो – कशी समाजविघातक असते हे या संग्रहातील बहुतेक साऱ्या कथांचे सूत्र आहे.

**उमेश कदम यांनी हा कथासंग्रह डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मृतीला अर्पण केला आहे व त्यापोटी मिळणारे लेखक मानधन त्यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीस देऊ केले आहे.**




**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**



**पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे अध्यक्ष झी जिनपिंग यांची 'ब्रिक्स' शिखर परिषदेच्या निमित्ताने ब्राझिलमध्ये झालेली भेट**

तिबेटबरोबर व्यापार चालू ठेवण्याची तडजोड नेहरूंनी स्वीकारली, पण चीन आणि भारत यांच्यातील सीमा निश्चित करण्याच्या वादग्रस्त विषयास बगल दिली. किंबहुना तिबेट ताब्यात दिल्यावर अक्साई चीनवरील हक्क चीन सोडून देईल; तसेच ईशान्य भारतातील 'मॅकमॅहान रेषा' हीच भारत आणि चीन यांच्यातील सीमा असल्याचे वास्तवही स्वीकारेल, अशी नेहरू यांची समजूत होती. पण १९५९ मध्ये तिबेटचे धर्मसत्ताधीश दलाई लामा यांनी भारतात राजकीय आश्रय घेतला आणि अक्साई चीनमधील चीनव्याप्त प्रदेश पुन्हा आपल्या नियंत्रणाखाली आणण्यासाठी 'फॉरवर्ड पॉलिसी'चा पुरस्कार करून भारताने केला, तेव्हा चीनला आक्रमण करण्यास निमित्तच मिळाले. २० ऑक्टोबर १९६२ रोजी युद्धाची ठिणगी पडली आणि तशी शांततामय सहअस्तित्वाची शक्यताही संपली.

भारत आणि चीन यांच्यातील १९६२ चे युद्ध आणि त्यातील आपला पराभव हा नेहरूंच्या कारकिर्दीवरील एकमेव म्हणावा असा डाग आहे. या युद्धाला पन्नास वर्षे झाली. त्याच्या कारणमीमांसेचा शोधही अजून चालूच आहे. जगाचा आर्थिक तोल पाश्चिमात्य राष्ट्रांकडून सरकत चीन आणि भारत या संभाव्य महासत्तांच्या शेजाऱ्यांच्या दक्षिण आशियात येऊन ठेपला, तरी उभय देशांमधील सीमेचा वाद अजून संपलेला नाही. समाजवादाची कास सोडून भारताने १९९१ पासून आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारले. आज विकासाचे 'मॉडेल' म्हणून मोदींच्या ज्या गुजरातचा उदो-उदो केला जातो, ते त्याचेच फळ आहे. ते देशभर राबवून व्यापार आणि अर्थकारणाच्या जागतिक स्पर्धेत आघाडी घेऊ पाहणारा मोदींचा भारत चीनबरोबरचे संबंध कसे हाताळतो, हे यापुढील काळात पाहण्यासारखे असेल. किंबहुना मोदी सरकारच्या परराष्ट्रधोरणाची ती सर्वात मोठी कसोटी ठरेल. नेहरूंनी ज्या संसदीय लोकशाहीचा पाया घातला, ती प्रत्यक्षात चीनबरोबरचा सीमा-तंटा सोडवण्यातील एक अडसर ठरली होती, असे सूतोवाच स्टीफन हॉफमन आणि रामचंद्र गुहा यांच्यासारखे इतिहासकार आता करू लागले असताना याच संसदीय लोकशाहीच्या चौकटीत राहून मोदी सरकार चीनबरोबरचा उरलासुरला वाद कायमचा मिटवू शकणार का आणि 'शांततामय सहअस्तित्वा'च्या तत्त्वासह भारताला आर्थिक महासत्ता बनवण्याचे स्वप्न वास्तवात उतरवणार का, याचे उत्तर काळापेक्षा मोदींचे धोरणच देईल.

**- आल्हाद गोडबोले**
५०१, श्रीरामेश्वर भवन, समतानगर,
पोखरण रोड क्र. १, रेमण्डसमोर,
ठाणे (प) ४००६०६
alhadgodbole@gmail.com

# इराकचं कोडं

**डॉ. अनंत लाभसेटवार**






२००३ वर्षापूर्वी सर्वसामान्य अमेरिकन माणूस इराक हा इराण लिहिताना केलेला मुद्रणदोष समजे! मग १० वर्षं युद्ध लढल्यावर, जवळजवळ १००० अब्ज डॉलरचा भुर्दंड बसल्यावर आणि ४५०० जवानांची जीवितहानी व अगणित सैनिक जखमी झाल्यावर त्यांना इराक हा एक स्वायत्त देश आहे याची खात्री झाली. पण या भौगोलिक अज्ञानासाठी या देशाला भारी किंमत मोजावी लागली. तिच्या जागतिक वर्चस्वाला तडा गेला. शेवटी या युद्धाला कंटाळून २०११ मध्ये ओबामांनी एकतर्फी यश घोषित करून त्या देशातून सैन्य काढून घेतलं. परंतु आज इराक पुन्हा जगाच्या ऐरणीवर आला असून तो देश आता विघटनाच्या मार्गावर आहे. त्याची तीन शकलं होतील असं राजपंडित म्हणतात.

पण अशा दूरस्थ देशातल्या यादवीचं आपल्याला सूतक का? याचं एकशब्दी उत्तर आहे 'तेल.' आपला देश ७० टक्क्यांपेक्षा जास्त खनिज तेल आयात करतो. ते बहुतांशी मध्यपूर्व मुस्लिम देशातून येतं. त्याच्या जागतिक भावाचे परिणाम आपल्या अर्थकारणावर होतात. इराकमधील धुमश्चक्रीमुळे ते सध्या भडकले आहेत. त्यामुळे आपल्या देशाला परदेशी चलनाचा वाढता भाग या इंधनावर खर्च करावा लागत आहे. भाववाढीमुळे अगोदरच होरपळलेल्या देशाला हे छातीत खंजीर खुपसल्यासारखं होईल. वयात आलेल्या मुलाची भूक जशी वाढते तसं आपल्यासारख्या विकसनशील देशाच्या विकासासाठी खनिज तेल लागतं. ते महागल्यामुळे त्याचे परिणाम कांद्याच्या भावापासून रेल्वे-बसच्या तिकिटापर्यंत सर्व जीवनोपयोगी बाबींवर होतील यात शंका नाही.

म्हणून इराकचं कोडं समजून घेणं आवश्यक आहे.

या देशातील राजकारण धर्माशी निगडित आहे हे लक्षात ठेवणं आवश्यक आहे. भारतातील घटनात्मक धर्मनिरपेक्षता या

देशात सापडत नाही. इथे माणसाची ओळख त्याच्या धर्मावरून होते. विशेष म्हणजे तो सुन्नी की शिया पंथाचा हे निर्णायक ठरतं.

मध्यपूर्व भागातले सर्व देश मुस्लीमधर्मीय असले तरी या धर्माच्या ज्या दोन मुख्य शाखा आहेत त्यांच्यामधला कलह दीड हजार वर्षांपासून आजपावेतो मिटला नाही. मुस्लीम धर्म प्रोफेट महंमदानं इ.स. ६३२ साली स्थापन केला. पण त्यांच्या पश्चात खरा वारसदार कोण म्हणून जी भांडणं सुरू झाली ती आजही धुमसत आहेत. काहींना लोकशाहीपद्धती वापरून बहुमतानं निवडून येणाऱ्याला धर्मप्रमुख नेमायचा होता. हा पंथ सुन्नी म्हणून ओळखला जाऊ लागला. पण दुसऱ्या गटाला संस्थापकाचा जावई-अलीची, त्या जागी नेमणूक करायची होती. हा गट शिया म्हणून अस्तित्वात आला. हा मतभेद एवढा विकोपाला गेला की त्या दोन गटांत आजही विस्तव जात नाही. याचं कारण असं, की ६६१ मध्ये अलीचा खून होऊन दोन पंथांतील द्वेष तीव्र स्वरूपाचा झाला. ज्यू लोकांनी येशू ख्रिस्ताला सुळावर चढवलं म्हणून ख्रिस्ती व ज्यू धर्मांत वितुष्ट निर्माण झालं. पण दोन हजार वर्षांनंतर ते आता निवळलं. सुन्नी व शिया पंथांतील भेद मात्र अजून जसेच्या तसे असून त्यांनी इराकमध्ये डोकं वर काढलं.



बराक ओबामा आणि नौरी अल मालिकी

आज जगात पन्नासहून अधिक मुस्लिम देश आहेत. त्यातला सुन्नी कोणता व शियापंथीय कुठला हे सांगण्यात सर्वसामान्यांचा गोंधळ होतो. या देशांच्या सरहद्दी ठरवताना खुद्द चर्चिलना ते कठीण झालं. पण एक गोष्ट लक्षात ठेवली तर संभ्रम कमी होतो. जगातल्या १.२ अब्ज मुस्लिमांमधले ९० टक्के सुन्नी तर फक्त १० टक्के शिया आहेत. म्हणजे बहुतेक देश सुन्नी आहेत. भारतातले मुस्लिम, पाकिस्तान, सौदी अरेबिया, सिरिया, इजिप्त हे सर्व देश सुन्नीच. फक्त इराण व दक्षिण इराकमध्ये शिया मोठ्या प्रमाणात सापडतात. याचा अर्थ लोणकढे तुपासारखे सर्व देश शुद्ध आहेत असा नव्हे. सुन्नी देशांतही काही शिया आणि शिया देशांत काही सुन्नी सापडतातच. किंबहुना इराकमधले ४० टक्के लोक सुन्नीपंथीय आहेत. हे मिश्रण स्फोटक असल्यामुळे सध्या त्या देशात युद्ध सुरू आहे. सिरियाचे अध्यक्ष शियांच्या पोटशाखेचे तर प्रजा सुन्नी. या धर्मविसंगतीमुळे इथे युद्ध पेटलं.

इराकमधले ६० टक्के लोक शिया. त्यांच्यावर राज्य करणारा सद्दाम हुसेन सुन्नी होता. त्याला गादीवर राहण्यासाठी दंडुकेशाही वापरावी लागली. सध्याचे पंतप्रधान नौरी अल मालिकी मात्र शियापंथाचे. देशात ४० टक्के सुन्नी असले तरी त्यांनी विरोधकांना सत्तेत सहभागी होऊ दिलं नाही. त्यामुळे सुन्नी असंतुष्ट होऊन त्यांची निष्ठा ढळली.

अमेरिकेनं सद्दाम हुसेनजवळ महासंहारक शस्त्रं आहेत आणि ती अल कायदाच्या हाती पडली तर त्यामुळे न्यू यॉर्कला धोका पोचेल म्हणून त्या देशात घुसखोरी केली व सद्दामचा नाश केला. तिथली हुकूमशाही काढून त्या जागेवर बळजबरीनं लोकशाही स्थापन केली. बळजबरीनं म्हणायचं कारण एवढंच की ही राज्यप्रणाली त्यांना उपरी होती. त्यांच्या इतिहासात तिला कधीच स्थान मिळालं नव्हतं. हे कडू फळाचं बी पेरून गोड फळांची अपेक्षा करण्यासारखं होतं. जिथे लोकशाही कधीच नांदली नाही तिथे तिची पाळंमुळं रुजतील हा विचारच मुळी बालिश होता. बोटावर मोजण्याएवढे देश सोडले तर कुठल्याच मुस्लिम देशानं लोकशाहीला स्वेच्छेनं कवटाळलं नाही. त्यामुळे इराकमधली लोकशाही नावापुरतीच आहे असं म्हणायला हरकत नाही. कारण या राज्यपद्धतीत अल्पसंख्याक सुन्नींनी कधीच भाग घेतला नाही. त्यांच्या दृष्टीनं सद्दाम हुसेनच चांगला होता.

हे शहाणपण शिकायला अमेरिकेला १० वर्षं व १००० अब्ज डॉलर लागले. अमेरिकन प्रजा या आर्थिक आणि रक्तपाताला कंटाळली आणि तिनं कसंही करून हे युद्ध संपवा म्हणून तगादा लावला. या बाबतीत एक गोष्ट नमूद करण्यासारखी आहे. सुरुवातीला अमेरिकेनं जेव्हा या देशात घुसखोरी केली तेव्हा जग त्या देशाच्या उद्दिष्टाविषयी शंकित झालं. अमेरिकेचं खरं लक्ष्य इराकचं हित नसून त्या देशातले तेलाचे साठे आहेत असं राजपंडित म्हणू लागले. परंतु अमेरिकेनं या युद्धासाठी स्वत:चे पैसे वापरले. ते जवळ नसल्यामुळे उसने घेतले. पण तेलाचा एक थेंबही चोरला नाही. देश ताब्यात घेऊनही या काळ्या सोन्याचे सर्व पैसे इराकलाच दिले. असं दातृत्व इतिहासात क्वचितच सापडत असेल.

अमेरिकन जनतेच्या असंतुष्टपणाची नस ओबामांनी अचूकपणे ओळखली व निवडून आलो तर आपण हे युद्ध संपुष्टात आणू असं वचन त्यांनी दिलं. या अनुषंगानं त्यांनी २०११ मध्ये युद्धातून अंग काढून घेतलं. पण त्यावेळी हेरगिरी करण्यासाठी व वेळ आली तर नौरी अल मालिकींना टेकू देण्यासाठी अमेरिकेला ३०,००० ते ४०,००० सैनिक मागे ठेवायचे होते. अशा सैन्याला इराकी

कायद्यापासून अभय मिळावं अशी ओबामांनी अट घातली. ती त्या मुस्लिम देशाला मान्य नव्हती. नौरी अल मालिकींची ही ताठर भूमिका बघून अमेरिका संभ्रमात पडली. शेवटी ओबामांनी सर्व रसद, युद्धसामुग्री व शस्त्रास्त्रं, आपल्या कृतघ्न मित्राच्या स्वाधीन केली व देशाला राम राम ठोकला. ओबामांनी नौरी अल मालिकींवर पुरेसा दबाव न आणता एवढ्या सहजासहजी माघार घेतली म्हणून रिपब्लिकन पक्षानं त्यांना टोले मारले.

आता आपलं अस्तित्व धोक्यात आलं म्हणून नौरी अल मालिकींनी अमेरिकेचे पाय धरले व आपल्या संरक्षणार्थ सैन्य पुन्हा पाठवा म्हणून याचना केली. अमेरिकन सैन्य लढण्यासाठी इराकमध्ये पुनरागमन करणार नाही असं ओबामांनी ठाम उत्तर दिलं. नाही म्हणायला त्यांनी बगदादमधील अमेरिकेच्या दूतावासाच्या संरक्षणार्थ ३०० खास सैनिक पाठवले. ही वकिलात अमेरिकेनं १ अब्ज खर्च करून नव्यानंच बांधलेली व आशिया खंडातली सर्वात मोठी आहे. याशिवाय लष्करी सल्लागार म्हणून अतिरिक्त ३०० जवान पाठवण्याचं कबूल केलं. पण नौरी अल मालिकींना यापेक्षा जास्त मदत पाहिजे होती. त्याविषयी त्यांची निराशा झाली.

नौरी अल मालिकींची गादी डळमळीत होण्याचं कारण म्हणजे आयसीस (ISIS, Islamic State of Iraq and Syria) म्हणून ओळखली जाणारी बंडखोर चळवळ. त्याच्या म्होरक्याचं नाव अबू बाकर अल बगदादी. तो एके काळी इराकमध्ये तुरुंगवासी होता. पण नौरी अल मालिकींना अशा लोकांचा उमाळा आल्यामुळे त्यांनी त्यांना स्वातंत्र्य दिलं. याचा फायदा घेऊन बगदादीनं ही जहाल, हिंसाचारी, शरिया कायद्याला आपलंसं करणारी व शिया मुस्लिमांचा बेंबीच्या देठापासून द्वेष करणारी चळवळ स्थापन केली. तो क्वचितच बाहेर पडतो व फोटो घेऊ देतो. कारण त्याच्यावर अमेरिकेनं १० दशलक्ष डॉलरची बक्षिसी ठेवली आहे. अवैमानिक विमानांची (drones) त्याला भारी भीती. त्यामुळे त्याचं जीवन अस्थिर झालं आहे. शियांपेक्षाही तो अमेरिकेचा जास्त द्वेष करतो. आपले अनुयायी न्यू यॉर्कमध्ये पाठवून त्या बलशाली राष्ट्राचा सूड उगवण्याचा विडा त्यानं उचलला आहे.

ही धमकी पोकळ नाही. बगदादीनं एकूण ८१ देशांतून इच्छुक दहशतवादी आकर्षित केले. त्यातले शेकडो अमेरिका, ग्रेट ब्रिटन, जर्मनी व फ्रान्स यांसारख्या पाश्चात्त्य देशांतून आलेले. ते या देशांचे पारपत्रधारक असल्यामुळे त्यांना मायदेशी परतण्यास व बगदादीची हिंसक चळवळ आयात करण्यास मुळीच अडचण पडणार नाही. आपल्या दहशतवादाची सोंड अमेरिकेत पसरवण्यास बगदादीला त्यामुळे आत्मविश्वास वाटतो.

जे पाश्चात्त्य देशांचं तेच भारताचं. या ८१ देशांत आपल्या देशाचा समावेश नक्कीच होत असणार. हे दहशतवादी काश्मीर व खुद्द भारतात घुसखोरी करून धुमाकूळ माजवतील यात शंका नाही. म्हणून या नवीन चळवळीची आपल्यालाही दखल घेणं आवश्यक आहे.

या दहशतवाद्यांनी युद्धग्रस्त सिरियामधला बराच मुलुख जिंकला व मग खुद्द इराकवर शरसंधान करून त्या देशातलं दुसऱ्या नंबरचं शहर, मुसुल, काबीज केलं. त्यानंतर पटापटा उत्तर इराकमधली चार शहरं ताब्यात घेतली आणि बगदादपासून ४० मैल उत्तरेला असलेल्या देशातील सर्वाधिक मोठ्या तेल शुद्धिकरण कारखान्याला घेराव घातला. हे बघून नौरी अल मालिकींचं धाबं दणाणलं. आयसीसचं एकूण संख्याबळ फक्त १०,००० असं म्हणतात. याउलट इराकचं कागदावर तरी ११ लाख सैन्य असून अमेरिकेनं त्याला अद्ययावत प्रशिक्षण व अब्जावधी डॉलरची आधुनिक शस्त्रास्त्रं दिली होती. तरीही नौरी अल मालिकींच्या फौजेनं माघार का घेतली? याचं कारण धर्मनिष्ठा. बगदादी व त्याचे सर्व दहशतवादी सुन्नीपंथीय. त्यांची आगेकूच बघताच इराकी सैन्यातील सुन्नी सैनिकांनी आपले लष्करी गणवेश काढून फेकून दिले आणि ते आयसीसला जाऊन मिळाले. या फितुरीमुळे बगदादीचं आक्रमण सोपं होऊन लष्करी छावण्या तिथल्या युद्धसामुग्रीसह त्याच्या हाती पडल्या. आयसीस अमेरिकन शस्त्रास्त्रं वापरून नौरी अल मालिकींचा पाडाव करू लागली. हे मालिकींचीच बोटं त्यांच्या घशात कोंबण्यासारखं होतं.

मग बगदादीनं सिरिया व इराकच्या सरहद्दीवर असणाऱ्या अनेक सीमांतर चौक्या ताब्यात घेऊन दोन देशांमधील ब्रिटिशांनी काढलेली रेषा पुसून टाकली व पूर्व सिरिया आणि उत्तर इराकमधला भूप्रदेश एकत्र करून इस्लामिक स्टेट नावाचं नवीन राष्ट्र स्थापन केलं. प्रोफेट महंमद याचा वारसदार म्हणून स्थापन केलेल्या देशाला कॅलिफेट (Caliphate) म्हणतात. हे कॅलिफेट यशस्वी झालं व त्याला राजकीय स्थैर्य मिळालं तर इराकचा उत्तर भाग कायमचा इस्लामिक स्टेटमध्ये संमीलित होऊन त्या देशांची तीन शकलं होतील– कर्डस्, इस्लामिक स्टेट व दक्षिण इराक. त्या भागात शिया–

**अबू बाकर अल बगदादी**



पंथीयांचं प्राबल्य असल्यामुळे बगदादी त्यांच्या वाट्याला जाणार नाही असं म्हणतात.

या बदलत्या भौगोलिक वस्तुस्थितीचा पहिला फटका बसला तो अमेरिकेला, बगदादीच्या रूपानं. ओसामा बिन लादेनपेक्षा सवाई जहाल राक्षस निर्माण झाल्यामुळे हे महासत्ताक राष्ट्र काळजीत पडलं आहे. या धूमश्चक्रीमुळे तेलाचे जागतिक भाव तर भडकलेच, पण त्या इंधनाचं राजकारणही बदललं. अमेरिकेचा प्रभाव कमी होऊन जॉर्डन, सौदी अरेबिया या दोस्तराष्ट्रांना धक्का बसला.

दुसरा फटका बसला तो शियापंथीयांना. बगदादीनं त्या सर्वांना फाशीची शिक्षा सुनावली. पुढ्यात येताच कुठलेही प्रश्न न विचारता छातीत गोळ्या डागण्याचा आयसीसनं पायंडा पाडला. पण सुन्नी आणि शिया यांचा तोंडवळा सारखाच असताना त्यांना वेगळं कसं काढणार? त्याचे काही निकष आहेत. पहिलं म्हणजे नाव– हुसेन, हसन किंवा अब्बास ही शियाविशेष नावं अशावेळी आत्मघातकी ठरतात. खोटं बोलून या शिक्षेतून सुटका होऊ शकत नाही कारण खिशातली कागदपत्रं (पारपत्र, वाहनचालकाचा दाखला, शिधापत्र वगैरे) सत्य पटवून देतात.

दोन पंथांतील दुसरा महत्त्वाचा फरक म्हणजे मशिदीत प्रार्थना करताना अवलंबित केलेला पवित्रा. सुन्नी दोन्ही हात छातीसमोर धरून अल्लास्मरण करतात तर शिया ते मांडीवर ठेवून प्रार्थनामग्न होतात. या पद्धतीवरून ओळख पटली की धर्मद्रोही म्हणून शियांची लगेच विल्हेवाट करण्यात येते.

तिसरा फरक म्हणजे धार्मिक संगीत. प्रत्येक पंथाचं वेगळं संगीत असतं. ते त्याच्या भ्रमणध्वनीवर आदळलं की खेळ खल्लास. शेवटी त्याचा पत्ता त्याच्या धर्माचं गूढ सांगतंच. तो शिया वेटाळातून आला असेल तर प्राणंतिक शिक्षा झाली असं समजा. नुसता संशय शिक्षापात्र ठरतो. त्यासाठी पुरावा लागत नाही.

आयसीस म्हणजे पाण्यावरच्या बुडबुड्यासारखी एक भंगूर चळवळ नव्हे. याचं कारण असं की बगदादीनं सिरियामध्ये व उत्तर इराकमध्ये काही तेलशुद्धिकरणाचे कारखाने व तेलाच्या खाणी काबीज केल्या. त्यापासून होणाऱ्या उत्पन्नस्रोतमुळे या चळवळीला आर्थिक स्थैर्य लाभेल असं म्हणतात. नौरी अल मालिकींचं कमकुवत सैन्य बगदादीला स्थानच्युत करू शकत नाही हे सिद्ध झालं. म्हणून आता जगाला लादेनच्या नवीन अवताराला तोंड देण्यास तयार व्हावं लागेल हे उघड आहे. बगदादी अतिसंहारक व निर्घृण हत्याप्रवण असल्यामुळे तो जास्त जीवितहानी करेल. मध्यपूर्व भागातला भूगोल बदलवेल व तिथल्या सत्तासमीकरणात उलथापालथ करेल यात शंका नाही.


**– डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

2 Second Street, Unit # 2001,

Jersey City, N.J. 07302

latalabh@aol.com



**ग्रंथाली**

**'संकल्पनाकोश'ला मिळालेले पुरस्कार**

- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
  ना.गो. कालेलकर पुरस्कार २०११
  *संकल्पनाकोश खंड १*
- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
  नरहर कुरुंदकर पुरस्कार २०१३
  *संकल्पनाकोश खंड २ ते ५*
- मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई
  केशव भिकाजी ढवळे २०१३
  *संकल्पनाकोश खंड १ ते ५*
- सार्वजनिक वाचनालय, नाशिक
  डॉ. वि.म. गोगटे पुरस्कार २०१३-१४
  *संकल्पनाकोश खंड १ ते ५*

**इंग्रजी थिसॉरसच्या धर्तीवर प्रथमच...**




**सुरेश वाघे**

लिखित

**संकल्पनाकोश**

**खंड १ ते ५**













मूळ किंमत ३२०० रुपये सवलतीत २४०० रु.

टपालखर्च २०० रु.

MAjESTIC ON THE NET
majesticonthenet.com

मॅजेस्टिक आले घरोघरी !

आता मिळवा घरपोच पुस्तके !

# मॅजेस्टिक ऑन द नेट.कॉम

**आता मिळवा सर्व प्रकाशकांची मराठी व इंग्रजी पुस्तके घरपोच !**

**ऑनलाईन खरेदीकरिता भेट द्या -**

**majesticonthenet.com**

**फोनवरून ऑर्डर देण्यासाठी संपर्क करा - (022) 65666755**

कॅश ऑन डिलिव्हरी उपलब्ध (C.O.D)

Click करा → majesticonthenet.com

# राज्याची धर्मातीतता ही परंपरागत भारतीयताच!

## डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी

मुळातल्या लॅटिन 'सेक्युलस' वा 'सेक्युलॅरिस' या शब्दांचा शतक, काळ वा युगवाचक अर्थ आज 'सेक्युलॅरिझम' या संकल्पनेला लागू पडत नाही. धर्म या संकल्पनेची विरुद्धार्थी संकल्पना म्हणून 'धर्मनिरपेक्ष' या संकल्पनेची मांडणी संघटित संस्थात्मक धर्माच्या पुढाऱ्यांकडूनच प्रामुख्याने केली जाते. त्यामुळे तिला अधार्मिकही ठरवले जाते. विशिष्ट धर्माच्या कायद्यांनी वा नियमांनी न बांधलेले असे तत्त्व म्हणजे 'धर्मनिरपेक्षता' वा 'सेक्युलर.' भौतिक, जडवादी, ईहवादी असेही या संकल्पनेचे अर्थ संभवतात. मात्र सर्वार्थाने राज्य हे इहलोकीच्या सुखाचे साधन ठरवण्यासाठी ते धर्मातीत असणे आवश्यक मानले जाते.

राज्य हे विशिष्ट धर्माधिष्ठित नसणे, ते धर्मराष्ट्र नसणे, ते कोणत्याही विशिष्ट धर्माच्या धर्मग्रंथ, नियम, रुढी, परंपरा कायद्याने चालणारे नसणे, तर त्याबद्दल राज्य हे तटस्थ असणे, कोणत्याही धर्मापासून पूर्णपणे अलिप्त अशा राज्याच्या स्वत:च्या कायद्याने चालणारे ते असणे हा या संकल्पनेचा सर्वमान्य व रुढ असा अर्थ स्वीकारला गेलेला आहे. 'सेक्युलर' या शब्दाला समानार्थी वा त्याचा उपरोक्त नेमका अर्थ विशद करणारा शब्द म्हणूनच 'धर्मनिरपेक्ष' वा 'धर्मातीत' हा शब्द स्वीकारला व वापरला जातो.

या संकल्पनेचे मूळ हे पौर्वात्य वा भारतीय नसून ते 'ख्रिश्चनडम' म्हणजे संस्थात्मक अशा स्वरूपाच्या ख्रिश्चन धर्माच्या प्रभावाखालील राज्य संकल्पनेच्या विरोधात उद्भवलेल्या विचारव्यूहात आहे. त्यामुळे अन्य संस्थात्मक असणाऱ्या व नसणाऱ्याही धर्मीयांच्या प्रवक्त्यांना वा पारंपरिक, सनातनी धर्मनिष्ठवाद्यांना ही संकल्पना म्हणजे आपल्या धर्माचे व त्यानिमित्ताने आपल्या धार्मिक संस्कृतीचे उच्चाटन करणारे आक्रमण वाटत आले आहे.

चर्चच्या संस्थेला आपले अस्तित्व व स्वायत्तता टिकवण्यासाठी राज्यापासूनचे जे वेगळेपण आवश्यक वाटत होते ते खरे तर या संकल्पनेच्या इतिहासाशी निगडित आहे. धर्मयुद्धांच्या काळात ख्रिश्चनांमधीलच वेगवेगळ्या पंथांना सहअस्तित्वासाठी सुरक्षित वातावरणाची गरज निर्माण झाली होती. ती या संकल्पनेच्या उदयाच्या मुळाशी होती. शांततामय सहअस्तित्वाची गरज आणि अराजकाच्या जागी राजकीय व्यवस्थेची गरज जी धर्मसत्तेशी संबंधितच असेल असा एक विचार, तर ईश्वर असो वा नसो मात्र स्वतंत्र अशा नीतीमत्तेची गरज तर आहेच असा दुसरा विचार होता. एक विचार कोणत्यातरी मूलभूत अशा तत्त्वांसोबतच्या समन्वयाचा मूलतत्त्ववादी, तर दुसरा राजकीय नैतिकता ही स्वतंत्र अशा आधारावरच असावी असा विचार.

हॉब्जने ख्रिश्चनधर्मीयांच्या सार्वजनिक क्षेत्रातील हस्तक्षेप वा मागण्या औचित्यविहीन ठरवल्या. सार्वजनिक क्षेत्रात धर्मापासून वेगळी, स्वतंत्र नीतीमत्ता हीच सर्वोच्च ठरवली. खाजगी जीवनात ज्याने त्याने आपली श्रद्धा, धर्म पाळावा, त्याच्या विवेकाने त्याने श्रद्धा बाळगावी, मात्र सार्वजनिक क्षेत्रातील स्वतंत्र नीतीमत्तेचा अनादर मात्र करू नये, अशी ती संकल्पना होती. धर्म ही त्यामुळे खाजगी बाब ठरली. चर्चपासून राज्याचे वेगळेपण हे याच आधारावर मान्य झाले आहे. यात राज्याने विशिष्टच धर्म-संप्रदायाचे असू नये हेच अपेक्षित आहे. सर्व धर्म-पंथ-संप्रदाय यापासून राज्य हे त्यामुळे समान अंतरावर असणे इथे अपेक्षित आहे.

आजचे जग हे पूर्वीसारखे एकभाषक, एकसांस्कृतिक, एकधर्मीय अशा टोळ्या, समूह वा राष्ट्रांचे उरलेले नाही, हे कोणीच अमान्य करण्याचे कोणतेच कारण नाही. ते व्यापार-उदीम, रोजगाराच्या संधी, तंत्रज्ञान, संवाद-साधने, माध्यमे इत्यादींच्या सहभागी वापराने बहुभाषक, बहुधर्मीय, बहुसांस्कृतिक झाले आहे. आपआपले धर्म, उपासना, श्रद्धा यांचा त्याग न करताही इतरांना त्यापासून इजा पोचणार नाही व सार्वजनिक जीवन हे विशिष्ट वा बहुसंख्याकांच्या श्रद्धा, धर्म, पंथ, उपासनापद्धती यांच्या दबावाखाली जगण्याची सक्ती केली जाणार नाही, असे सर्वसहमतीचे व सहअस्तित्वाचे सार्वजनिक जीवन ही आज या पृथ्वीतलावरील सर्वच मानवी समूहांची गरज आहे.

ही गरज भागवण्यासाठी राज्याने धर्म, उपासना यात हस्तक्षेप न करणे आणि धर्माने राज्ययंत्र विशिष्टच धर्माच्या कायद्याने चालवण्याचा आग्रह न धरणे आवश्यक आहे. राज्याच्या या धर्मविषयक तटस्थतेची व धर्माच्या या राज्यविषयक तटस्थतेची मुळे ही ख्रिश्चनधर्मीयांच्या आपसांतील कलहापासून हव्या

असणाऱ्या मुक्तीत शोधली जात असली तरी आधुनिक राज्याची धर्मातीतता ही काही ख्रिश्चनांचीच तेवढी गरज उरलेली नाही. ती साऱ्या जगातील साऱ्याच धर्मीयांची समान सामूहिक गरज झालेली आहे. कोणत्याही विशिष्ट धर्माच्या कायद्यांच्या, नियमांच्या अथवा स्मृतींच्या आधारे लादली न गेलेली सार्वजनिक व राष्ट्रीय जीवनातली नैतिकता म्हणजे धर्मातीतता एवढी सहज, सुलभ व सुटसुटीत अशी धर्मातीततेची संकल्पना हीच तेवढी 'धर्मनिरपेक्षता' ठरू शकते.

'मानवाधिकार' ही संकल्पना ही त्यामुळेच धर्मातीत, धर्मनिरपेक्ष अशा राज्यासाठी मूलभूत महत्त्वाची अशी धर्मातीत नैतिक संकल्पना ठरते; सोबतच जनतेची सार्वभौमता, स्वातंत्र्य आणि समता हेदेखील या धर्मातीत नैतिकतेचे आधारस्तंभ ठरतात. भारतीय राज्यघटनेने म्हणूनच त्या साऱ्यांना नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचा दर्जा दिला आहे. मात्र त्यासाठी शांततामय सहअस्तित्व हे मूल्य म्हणून प्रतिष्ठित करण्याची नितांत गरज आहे. ते तेव्हाच शक्य आहे जेव्हा व्यक्तीची सहनशीलता उत्तेजक भावनिकतेला आवर घालून वाढीस लागेल. सहनशीलता हे मूल्य म्हणून वाढीस लागेल व त्या मूल्याचा संस्कार अगदी शालेय पाठ्यक्रमांपासून ते माध्यमांमधून चालणाऱ्या साऱ्या चर्चा, निरुपणे, वाद-विवाद यातून बिंबवला जाईल.

याउलट ऊठसूट भावना दुखावण्याचे राजकारण करणाऱ्या लोक व समूहांची उभारणी करून त्या माध्यमातून उत्तजेक अशी जी भावनात्मक आवाहनबाजी केली जाते व राज्यकर्त्यांची अशा कृतींना सत्तेसाठी, मतांच्या राजकारणापोटी अटकाव करण्याची जी राजकीय इच्छाशक्तीच नसते तोच शांततामय सहअस्तित्वासाठी आज सर्वात मोठा धोका आहे. हा धोका प्रत्यक्षात उत्तेजक आवाहनबाजी करणाऱ्यांपासून कमी; मात्र त्यावर आपल्या राजकीय पोळ्या भाजणाऱ्यांपासून अधिक आहे.

सहनशीलतेशिवाय दुसऱ्या व्यक्तीच्या, श्रद्धा, भावना, विचार, कृती यांना स्वत:च्या श्रद्धा, विचार, भावना यांच्यासारखे समत्व प्रदान केले जाऊ शकत नाही. दुसऱ्याला सहन करण्याचा विवेक


**ग्रामीण बोलीचा शब्दकोश**

डॉ. द.ता. भोसले




मराठीच्या सर्व बोली समृद्ध आहेत. त्यांचा वापर व्हावा, त्यातून मराठी समृद्ध व्हावी, नव्या पिढीला ज्ञात व्हावी या भावनेने साकारलेला ग्रामीण बोलीचा हा शब्दकोश...

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

**माझ्या काळजाची गोष्ट**

सुनीता संगवई




ही कहाणी आहे आधुनिक काळातील, 'ऱ्हुमॅटिक हार्ट डिसिज' या एखाद्याला होणाऱ्या दुर्धर रोगावर चालू असलेले ॲलोपॅथी उपचार सोडून, फक्त निसर्गोपचार करून जीवदान मिळवणाऱ्या एका वीस वर्षांच्या मुलीची!

**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

# वैश्विक उपचार

**चाकोरीबाहेरी विचार**

**विपिन मेहता**

अनुवाद : **विजया बापट, संपादन : अपर्णा वेलणकर**




'मनोरचना बदला, जग बदला' असे सांगणारे विपिन मेहता त्यांच्या 'वैश्विक उपचार' (ग्लोबल हिलिंग) या ग्रंथत्रयीपैकी या पहिल्या ग्रंथात, नकारात्मक संकोचित मनोरचनेचे सकारात्मक विधायक मानसिक रचनेत 'परिवर्तन' घडवण्यासाठी अध्यात्मशास्त्र कसे लागू करता येईल हे आपल्याला दाखवून, ते आपला प्रवास सुरू करून देतात आणि आपल्या पसंतीचे वास्तव निर्माण करण्यासाठी, त्याची बांधणी करण्यासाठी व ते प्रत्यक्षात आणण्यासाठी आध्यात्मिक साधने आपल्या हाती देतात आणि ते करताना आपले बाह्य जड जग अंतिमत: आपल्या आंतरिक जगाचे प्रतिबिंब कसे आहे ते दाखवतात.

**मूल्य १८० रुपये ● सवलतीत ११० रुपये**

प्रत्येकात असल्याशिवाय सहनशीलता वाढीस लागू शकणार नाही. सहिष्णुतेचा, सहनशीलतेचा, परस्परांच्या अस्तित्वाचा आदर करणारा विवेकी संवाद हा प्रत्यक्ष व्यवहारातून, कृतीतून, माध्यमांमधून, कला, साहित्य या साऱ्यांतूनच प्रस्थापित होणे व प्रतिष्ठित होणे गरजेचे आहे.

आज मात्र चित्र नेमके उलटे आहे. असहिष्णू, अविवेकी, काहीच सहन न करता पेटून उठण्याची भाषा बोलणारा संवाद हा अधिक प्रतिष्ठित केला जातो आहे. 'झिरो टॉलरन्स' म्हणजे सहनशीलताविहीन अशी धोरणे हीच गरज असल्याचे भासवले जात आहे.

असहिष्णू व अविवेकी अशा बहुमताचा दबाव निर्मिणारे राजकारणच खेळले जात आहे. दुसऱ्याचा विचार, भावना, मत, धर्म, अभिव्यक्ती यावर आपल्या विचाराने, भावनेने अतिक्रमण करण्याचा जणू आपला जन्मसिद्ध हक्कच आहे, असे बिंबवणाऱ्या असहिष्णू शक्तींच्या हातचे आता राजकारण हे खेळणे झालेले आहे. खरे तर हे खेळणेच अशाच राजकारणासाठी निर्मिले गेले आहे. हे राजकारण, हा अविवेक, ही असहिष्णुता ही दुसऱ्याचे काहीच सहन न करण्याची- 'झिरो टॉलरन्स' - प्रवृत्ती हीच खरे तर मुळात 'अभारतीय' अशी देणगी आहे. कारण धर्मातीत राज्यासाठी अन्य धर्मियांप्रती सहिष्णुता आवश्यक असून हिंदूंचा हिंदुस्थान व त्यांचा धर्म हा तर परंपरागतरीत्या सर्वाधिक सहिष्णू व सहनशीलता बाळगणारा व ती इतरांना शिकवणारा धर्म समजला जातो. म्हणजे परंपरेने भारतीयतेचे लक्षण हे सहिष्णुता व सहनशीलता हेच आहे. राज्याच्या धर्मातीततेसाठी त्यामुळे भारतीयांना त्यांच्या रक्तातच असलेली सहिष्णुता, सहनशीलता ही पाश्चात्य धर्मातीत राज्याकडून उधार घेण्याची गरजच नव्हती व नाही. ती घेतलेलीही नाही. त्यामुळे ती तशी भारतीय नसल्याचा प्रचार हा अपप्रचार ठरतो. उलट तिची शिकवणच भारतीय समाजाने इतरांना द्यावी इतका हा समाज याबाबत परंपरागत सक्षम आणि समर्थ आहे.

दुसरे म्हणजे, हिंदू हा ख्रिश्चन वा इस्लाम धर्मांसारखा संस्थात्मक व एक चालकानुवर्ती ग्रंथ, आज्ञा, फतवे, एक आदेश यांनी चालणारा धर्म नसल्याने, धर्मातीत राज्य सुस्थिर होण्यात हिंदू धर्माचा संघटनात्मक, संस्थात्मक असा अडथळाच नाही. म्हणूनच हे राज्य व ही लोकशाही धर्मातीत म्हणून निर्मिली गेली व टिकली आहे. खाजगी जीवनात सनातनी असणाऱ्या लोकमान्य टिळकांनी पाया रचलेला भारतीय राष्ट्रवाद मात्र त्यामुळेच इहवादी व धर्मातीत राष्ट्रवाद आहे, सांस्कृतिक वा धार्मिक राष्ट्रवाद नव्हे. भाऊजी दफ्तरींनी तर धर्माचे प्रयोजनच इहलोकाचे सुख मानले आहे.

भारतीय समाजाची ही पारंपरिक वैशिष्ट्ये आहेत. ती नाहीशी करून या समाजाला असहिष्णू, अविवेकी करण्याचे, त्याच्या सहनशीलतेला सुरुंग लावण्याचे, त्याच्या धर्माला कधीच नसलेले व त्याने कधीच स्वीकारले जाणे शक्य नसलेले संस्थात्मक, संघटित, विशिष्टांच्याच आदेशावर, आज्ञेवर, चालणाऱ्या धर्माचे स्वरूप देण्याचे प्रयत्न हेच मुळात अभारतीय व अ-हिंदू प्रयत्न ठरतात. असे प्रयत्न म्हणजे हिंदू समाजाचे अहिंदूकरण करण्याचे व त्याची पारंपरिक वैशिष्ट्ये नष्ट करण्याचे प्रयत्न करणे. हे संघटित, संस्थात्मक प्रयत्न फार प्राचीन नसून अशा संघटित व जाणीवपूर्वक करण्यात येणाऱ्या प्रयत्नांचा इतिहास हा स्वातंत्र्यपूर्व काळात अतिशय क्षीण अशा स्वरूपाचा दिसतो. स्वातंत्र्योत्तर काळातही पहिली तीन दशके त्या प्रयत्नांना फारसे बळ प्राप्त झालेले दिसत नाही. त्या तुलनेत नंतरच्या म्हणजे गेल्या तीन दशकांतच हे प्रयत्न अधिक आक्रमक स्वरूप धारण करताना दिसतात.

थोडक्यात, भारतात खाजगीकरण, उदारीकरणाचा स्वीकार, सामाजिक नियंत्रणाच्या धोरणाचा त्याग आणि अनिर्बंध नफा कमावण्यावरील निर्बंध हटवून घेतलेली व्यवस्था यांच्या प्रभावाचे व दबावाचे युग कायदेशीर दृष्ट्या अवतरणे आणि ह्या प्रयत्नांना अधिकचे बळ लाभणे यात एक प्रकारचे नाते प्रस्थापित झालेले आहे, हे स्पष्टच दिसते.

राज्याची धर्मातीतता संपुष्टात आणण्याचे कोणतेही प्रयत्न करणे म्हणजे विशिष्टच धर्माच्या नावावर सत्तेचे संघटन व सत्तेचे ध्रुवीकरण करणे होय. त्यात रस असणारे, त्यातच आपले हितसंबंध सुरक्षित असल्याचे वाटणारे व त्यासाठी संघटित प्रयत्न करणारे वर्ग व जाती मुख्यत्वे कोणत्या आहेत व त्यांचे छुपेपणाने बळ वाढवणारे, वरकरणी धर्मातीत राज्याचा पुरस्कार करणारे देखील कोणत्या वर्ग व जातींचे प्रतिनिधित्व करतात याचे व्यवस्थित समाजशास्त्रीय अध्ययन केले जाणे गरजेचे आहे. तसे झाल्यास धर्मातीत राज्याची प्रचंड मोठ्या लोकसंख्येच्या उत्थानासाठी आवश्यकता आहे व ती नष्ट केली तर नेमके कोणाचे नुकसान आहे हे सप्रमाण सिद्ध करता येईल. अनुभवजन्य अशा शोधाच्या आधारावर तर ते सिद्धच आहे. हे सारे याकरता करायचे की विकासाच्या नावावर राज्यसत्तेचे ध्रुवीकरण हे धर्मातीत राज्यालाच सुरुंग लावणाऱ्या शक्तींच्या बाजूने होणार नाही हे बघण्याची कधी नव्हे एवढी मोठी गरज आज निर्माण झाली आहे. कारण विकास हा समन्यायी, सर्वांगीण, सर्वसमावेशक आणि लोकानुवर्ती व्हायचा असेल तर धर्मातीत लोकशाही राज्य टिकणे सर्वात महत्त्वाचे आहे. या धर्मातीत लोकशाही अभिव्यक्तीलाच आज विविध प्रकारे चूप बसवणे सुरू आहे. ते प्रयत्न दूर सारणे ही आज प्राथमिक गरज झाली आहे.

**- डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी**
१०५, संकल्प सहनिवास, ४०, खरे टाऊन,
धरमपेठ, नागपूर ४४००१०
भ्रमणध्वनी : ९९६०४९३६२२
shripadbhalchandra@gmail.com

## अरुण शेवते संपादित पुस्तके




### माझं जन्मघर

गुलज़ार, सुशीलकुमार शिंदे, यशवंतराव गडाख, आरती अंकलीकर टिकेकर, राजन खान, हेमंत टकले, किशोर कदम, आदींनी आपल्या जन्मघराच्या जागवलेल्या आठवणी

**मूल्य १८० रु. सवलतीत ११० रु.**




### मन पाहि मागे मागे...

गुलज़ार, बाबासाहेब पुरंदरे, गिरीश कुबेर, यशवंतराव गडाख, राजीव खांडेकर, द.ता. भोसले आदी मान्यवरांनी आपल्या मनातली रेखाटलेली भावस्पर्शी स्मृतिचित्रे.

**मूल्य १८० रु. सवलतीत ११० रु.**




### हिंडताफिरता

गुलज़ार, कुमार केतकर, सतीश काळसेकर, नवनीता सेन, डॉ. उज्ज्वला दळवी आदींनी भ्रमंतीतून मिळालेला आनंद आपल्यापर्यंत पोचवला आहे.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

### तणावमुक्त जीवन
तरुणांपुढील आव्हान

**डॉ. पी.एस. रामाणी**




बदललेल्या जीवनशैलीत तरुणांनी आव्हानांना सामोरे जाताना मनावर असलेला ताण कसा दूर करावा आणि आनंदी, समाधानी जीवन कसे जगावे याचा मंत्र देणारे हे पुस्तक...

मूल्य १३० रु. सवलतीत ८० रु.

### दृष्टीपलीकडील सृष्टी

**उमेश कदम**



आफ्रिका – एक अगम्य आणि अद्‌भुत खंड! तेथील गूढपरंपरा, जादूटोणा,चेटूक आणि चालीरीतींवर आधारित सत्यकथा

मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.

### जन्मरहस्य

**डॉ. आनंद नाडकर्णी**

‘जन्मरहस्य’! खरे तर हे फक्त एका व्यक्तीचे जन्मरहस्य नाही तर जन्म नावाच्या प्रवासाचे रहस्य आहे. जुनके आणि संस्कार ह्यातून तयार होणाऱ्या माणसाच्या घडणीचे रहस्य आहे.



मूल्य ७५ रु. सवलतीत ५० रु.

### सल
**प्रगती कोळगे**



‘सल’मधील कथा वाचून अंतर्मुख व्हायला होतं. लेखिकेने ओघवत्या शैलीमधून, मनाच्या तगमगीतून मांडलेल्या वाचनीय कथांचा संग्रह

**मूल्य ८० रु. सवलतीत ५० रु.**

### दृष्टिपटल
**डॉ. माधवी मेंहेदळे**




एका संवेदनशील मनाने प्रांजळपणे कथन केलेला देहाच्या अभ्यासापासून ते देहाच्या जाणिवे-पलीकडच्या अनुभवविश्वातला ‘दृष्टिपटल’ हा प्रवास आहे.

**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

### गौटी व पिंटू
**सु.गो. तपस्वी**



कौटुंबिक वातावरण किती प्रसन्न व आधारदायी असू शकते, हेही मुलांना कळले पाहिजे. या दृष्टीने ‘गौटी व पिंटू’ यासारख्या पुस्तकाचा चांगला उपयोग होईल.

**मूल्य १२५ रु. सवलतीत ७५ रु.**

विज्ञान विलोल

# मुक्त व्यसनी आणि व्यसनमुक्ती

**सुधीर थत्ते**

**व्यसनी** मंडळींना कायद्याच्या जाचातून मुक्त केले तर त्याचे नेमके काय परिणाम होतात, हे पाहणारा एक आगळावेगळा प्रयोग सध्या अमेरिकेतल्या कोलरॅडो संस्थानात चालू आहे. तिथे जगात पहिल्यांदाच करण्यात आलेल्या कायद्यानुसार एकवीस वर्षे किंवा त्याहून मोठ्या असणाऱ्या व्यक्तींना मौजेसाठी, करमणुकीसाठी किंवा मानसिक सुखासाठी 'मॅरिहुआना' खरेदी करता येणार आहे. मॅरिहुआना (याच्या इंग्रजी स्पेलिंगमुळे काही वेळा याचा 'मॅरिजुआना' असा चुकीचा उच्चार केला जातो!) हे मादक द्रव्य असून ते कॅनबिस, हॅश, हेंप, पॉट, डोप, मेरी जेन अशा जवळजवळ तीस वेगवेगळ्या नावांनी जगभरात प्रसिद्ध आहे. आपल्याकडे त्याची भांग, गांजा, चरस आणि हशीश ही नावे जास्त प्रचलित आहेत. आतापर्यंत कोलरॅडोतल्या दीडशेहून जास्त दुकानांनी मॅरिहुआनाची रोपे लावण्याचा आणि मॅरिहुआना विकण्याचा परवाना घेतला असून, या दुकानांमधून एकवीस वर्षांहून मोठ्या असणाऱ्या व्यक्तीला एका वेळी अठ्ठावीस ग्रॅम मॅरिहुआना खरेदी करता येईल. एवढे मॅरिहुआना वापरून सुमारे साठ जॉइंट (मॅरिहुआनाने भरलेल्या सिगारेटी) तयार करता येतील. कोलरॅडोबाहेरून आलेल्या (एकवीस वर्षांहून मोठ्या) पर्यटकांना मात्र एका वेळी फक्त सात ग्रॅम एवढेच मॅरिहुआना विकत घेता येईल. परवानाधारकांनी लावलेल्या मॅरिहुआनाच्या प्रत्येक रोपाला जोडलेल्या रेडिओ-टॅगच्या मदतीने मॅरिहुआनाच्या उत्पादनाचा हिशोब काटेकोर ठेवण्यात येईल. कायदेशीररीत्या राजरोसपणे मॅरिहुआना खरेदी करता यायला लागल्यावर त्याच्या बेकायदा उत्पादनाला आणि विक्रीला आळा बसून मादक द्रव्यांच्या व्यापाराने गुन्हेगारीला मिळणारे खतपाणी आणि आर्थिक मलिदा बंद होईल, अशी आशा या कायद्याच्या पुरस्कर्त्यांना वाटते आहे. मानसशास्त्र, चेताविज्ञान, नीतिशास्त्र, गुन्हेप्रतिबंधशास्त्र, सार्वजनिक-आरोग्यशास्त्र आणि समाजशास्त्र अशा विविध ज्ञानशाखांमधल्या संशोधकांचे कोलरॅडोच्या या धाडसी प्रयोगाकडे बारकाईने लक्ष आहे.

जगातल्या काही देशांमध्ये मादक द्रव्य जवळ बाळगणे किंवा त्याचे सेवन करणे यासाठी थेट मृत्युदंडही देण्यात येऊ शकतो, तर काही देशांत यासाठी जन्मठेप होऊ शकते. बहुसंख्य देशांमध्ये मादक द्रव्य जवळ बाळगणे किंवा त्याचे सेवन करणे हा शिक्षापात्र गुन्हा आहे. युरोपात आणि अमेरिकेतल्या काही संस्थानांमध्ये योग्य त्या तज्ज्ञांच्या देखरेखीखाली वैद्यकीय उपचारांसाठी मादक द्रव्यांचा वापर करण्याची परवानगी अलिकडेच देण्यात आली आहे. अमेरिकेच्या संघराज्याच्या कायद्याप्रमाणे मादक द्रव्यांचा वापर करणे हे बेकायदेशीर आहे. पण कोलरॅडोने मॅरिहुआनाच्या वापराला परवानगी देण्यासाठी कायदा करण्याकरता मागच्या वर्षी रीतसर मतदान घेतले. जनमताच्या कौलानंतरच अमलात आलेल्या कोलरॅडोच्या या कायद्याने हनुमानउडी घेऊन केवळ मौजेखातर मादक द्रव्ये वापरण्याचा राजमार्ग खुला केला आहे!

अर्थात, फक्त मौजेसाठी मादक द्रव्यांचे सेवन मानव हजारो वर्षांपूर्वीपासून करत आला आहे. प्राचीन संस्कृत वाङ्मयात मादक द्रव्यांचा स्रोत असणाऱ्या 'गंजिका' या वनस्पतीचे वर्णन करण्यात आले आहे. या गंजिका शब्दापासूनच आधुनिक भारतीय भाषांमध्ये 'गांजा' हा शब्द आला. भारतातून गांजा प्राचीन असिरियात पोचला. तिथल्या अनेक धार्मिक समारंभांमध्ये त्याच्या धुराचा वापर होऊ लागला. या धुराला असणाऱ्या 'कनब' या प्राचीन असिरियन शब्दापासून 'कॅनबिस' हा शब्द आला. चीनमध्ये तीन हजार वर्षांपासून गांजाची लागवड केली जाते. त्याला वापरला जाणारा 'माऽ' हा शब्द संरक्षित जागेत वाढणाऱ्या गांजाच्या दोन रोपांच्या चिन्हाने दाखवला जातो. कॅनबिसचा वापर करण्यावर बंदी घालणारा कायदा विसाव्या शतकापूर्वी जगभरात कुठेही नव्हता. उलट, विविध धार्मिक समारंभांमध्ये अनेक ठिकाणी त्याचा मुक्त वापर होई.

विसाव्या शतकात मात्र एकापाठोपाठ एक बऱ्याचशा देशांनी कॅनबिसच्या वापरावर बंदी घातली. असे असले तरीही कॅनबिस हा जगातला सर्वात जास्त प्रमाणात उत्पादन केला जाणारा, तस्करी होणारा आणि बेकायदेशीरपणे सेवन केला जाणारा मादक पदार्थ आहे, असे संयुक्त राष्ट्रांचा २०१२चा 'जागतिक मादक द्रव्य अहवाल' म्हणतो. मिशिगन राज्य विद्यापीठाच्या लुइसा डेगेनहर्ट आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या अहवालानुसार अमेरिकेतल्या सज्ञान (अठरा वर्षांपेक्षा मोठ्या) असणाऱ्यांपैकी निम्म्या व्यक्तींनी कधीना कधी मौज म्हणून कॅनबिसचा उपयोग केला आहे, तर शाळेत शिकणाऱ्या दर

तीनजणांपैकी एका मुलाने कॅनबिसचा अनुभव घेतला आहे!

गांजाच्या वनस्पतीला 'कॅनबिस सटिव्हा' असे जीवशास्त्रीय नाव आहे. ही वनस्पती मूळची मध्य आशियातली. या वनस्पतीच्या डिंक, पाने, कळ्या आणि फुले यांच्यापासून बनणाऱ्या विविध उत्पादनांसाठी 'कॅनबिस' हेच सामान्यनाम सर्वसाधारणपणे वापरले जाते. वनस्पतीच्या या सर्व भागांमध्ये मनाला उत्तेजित करणारी किंवा धुंदी आणणारी आणि जास्त प्रमाणात घेतल्यास बेधुंद करणारी अनेक रसायने आहेत. या रसायनांना 'कॅनबॉइड' या नावाने ओळखले जाते. यातले 'टीएचसी' या संक्षेपाने प्रसिद्ध असणारे 'डेल्टा-९-टेट्रा-हायड्रो-कॅनबिनॉल' हे रसायन अत्यंत प्रभावी आहे. वाळलेल्या डिंकाच्या स्वरूपातील कॅनबिस हे 'हशीश' म्हणून सेवन केले जाते. या वनस्पतीची वाळलेली पाने (तंबाखूप्रमाणे) खाल्ली जातात. त्यांना अरबी भाषेतल्या (आणि मराठीतही असणाऱ्या) कैफ या शब्दावरून 'कय्फ' असे संबोधले जाते. या वनस्पतीची पाने तेलात उकळून काढलेला अर्क 'हश ऑइल' म्हणून आणि अल्कोहोलमधला अर्क 'ग्रीन ड्रॅगन' म्हणून घेतात. 'मॅरिहुआना' म्हणजे वाळलेल्या पानांचा किंवा कळ्यांचा भुगा हुक्का, चिलीम किंवा सिगारेटमध्ये जाळून त्याचा धूर सेवन करतात. हे धूम्रपान हा व्यसनी लोकांचा सर्वात आवडता प्रकार आहे, कारण यातून वीस ते बावीस टक्के एवढ्या मोठ्या प्रमाणात टीएचसी मिळते आणि त्यामुळे जोरदार 'किक' येते.

कॅनबिस अत्यल्प प्रमाणात सेवन केल्यास त्यातल्या रसायनांचा मेंदूतल्या चेतापेशीवर परिणाम होऊन त्यामुळे सुरुवातीला शांत आणि बरे वाटू लागते. अधिक सेवनाने स्मृतिकोषाचे कार्य मंदावते. त्यामुळे जणू आपण या जगाबाहेर पडलो आहोत असा भास होऊ लागतो. प्रचंड भुकेने पोटात खड्डा पडल्यासारखे वाटू लागते. काहीजणांना भयगंड वाटू लागतो. तसेच, मळमळ होते, अकारण चिंता वाटू लागते किंवा गरगरल्यासारखे होते. गांजाने तसेच हशीशमुळे मेंदू भ्रमल्यासारखा होतो. याचमुळे वेगवेगळे भास होतात. आपण उन्मुक्त झालो आहोत, आपल्याला दैवी सामर्थ्य प्राप्त झाले आहे, असे वाटू लागते. या आभासांची आध्यात्मिक अनुभवांशी गल्लत केल्यामुळे अनेकदा धार्मिक प्रवृत्तीचे लोकही त्याच्या व्यसनाचे बळी ठरतात.

विविध श्वसन विकारांपासून फुप्फुसांच्या कर्करोगापर्यंत अनेक रोग, तसेच तंबाखूच्या धूम्रपानाचे सर्व दुष्परिणाम गांजाच्या धूम्रपानानेही होतात. गांजामुळे बुद्धिमत्तेचा ऱ्हास होतो. मानसिक आरोग्य संपुष्टात येते. छिन्नमनस्कतेचा (स्किझोफ्रेनिया) विकार जडू शकतो. वैफल्य, नैराश्य यांचे झटके येऊन कधी कधी व्यसनी व्यक्ती आत्महत्येलाही प्रवृत्त होण्याचा धोका असतो. या व्यसनामुळे त्या व्यक्तीचे वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक जीवन उद्ध्वस्त होते.

व्यसनतज्ज्ञांच्या अंदाजाप्रमाणे जगातले किमान वीस ते पंचवीस कोटी लोक कॅनबिसचे सेवन करतात. अर्थात, अन्य व्यसने असणाऱ्यांचे प्रमाण याहूनही जास्त आहे. दारूचे व्यसन सुमारे पन्नास कोटींहून जास्त जणांना आहे, तर तंबाखूतल्या निकोटिनचे व्यसन असणाऱ्यांची संख्या याच्या दुप्पट म्हणजे सुमारे शंभर कोटींपेक्षा जास्त आहे!

सर्वच व्यसनांचा उगम हा व्यसनी व्यक्तीच्या मेंदूत होतो. म्हणून अलिकडेच केंब्रिज विद्यापीठातल्या व्हॅलरी व्हून आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विविध प्रकारच्या व्यसनांचे मेंदूतले उगमस्थान कोणते, याचा शोध घेतला. यासाठी त्यांनी स्वयंसेवकांच्या मेंदूच्या कार्यात्मक चुंबकीय अनुनाद प्रतिमांचा वापर केला. या प्रतिमांवरून एखादी गोष्ट घडताना मेंदूतला कोणता भाग सक्रिय होतो ते निश्चित करता येते. या अभ्यासात त्यांना असे आढळले की व्यसनाधीन व्यक्ती गांजासारख्या कोणत्याही मादक द्रव्याच्या सेवनाचे 'सुख' अनुभवत असताना तिच्या मेंदूतला जो भाग सक्रिय होतो तोच भाग एखादी व्यक्ती 'कामसुख' अनुभवत असतानाही सक्रिय होतो. यावरून दोन्ही प्रक्रिया ह्या एकाच चेतापेशीसमूहाकडून नियंत्रित



होत असाव्यात, असा निष्कर्ष त्यांनी काढला.

कामसुख ही अपघाताने झालेल्या जनुकीय जुळणीतून निर्माण झालेली आणि नंतर उत्क्रांतीच्या चाळणीने वाढत गेलेली प्रक्रिया आहे. अमिबासारख्या एकपेशीय प्राण्यांच्या पुनरुत्पादनात एका मूळ पेशीच्या दोन पेशी होतात. या नव्या पेशी हुबेहूब आधीच्या पेशीसारख्याच असतात. पण बहुपेशीय प्राण्याची उत्क्रांती झाल्यावर नर आणि मादी यांच्या समागमातून पुनरुत्पादन होऊ लागले. त्यात नर-मादी दोघांकडचे निम्मे-निम्मे जनुक एकत्र येऊन पिल्लाचे जनुक निर्माण होत असल्यामुळे जनुकांच्या या जुळणीतून आई-वडिलांपेक्षाही श्रेष्ठ असे गुण त्या पिल्लामध्ये निर्माण होण्याची शक्यता वाढली. त्यातून प्राण्यांच्या उत्क्रांतीचा वेगही वाढला. जनुकांच्या विशिष्ट जुळणीतून ज्या नराला किंवा मादीला समागमाच्या प्रक्रियेत अधिक कामसुख मिळू लागले, त्यांच्यात पुनःपुन्हा कामसुख मिळवण्याची इच्छा निर्माण झाली. साहजिकच त्यांचा

पुनरुत्पादनातला सहभाग वाढत गेला आणि पुढच्या पिढ्यांमध्ये त्यांच्यापासून जन्माला आलेल्या पिल्लांची संख्या वाढत गेली. यातूनच त्यांच्या मेंदूत कामसुखाचा अनुभव घेणाऱ्या आणि त्या प्राण्याला ते सुख पुनःपुन्हा मिळवण्याला प्रवृत्त करणाऱ्या चेतापेशींचा समूह निर्माण होत गेला.

प्राण्याच्या शरीरातल्या विविध नव्या भागांची रचना होताना निसर्गात एकाच पेशीसमूहाचा अनेक प्रकारे वापर करून घेतला जातो. यातून त्या पेशीसमूहाचा अधिक कार्यक्षमपणे वापर करण्याचा निसर्गाचा प्रयत्न असतो. पण यातूनच काही वेळा अनपेक्षित अशी गुंतागुंत निर्माण होते. याचे आपल्या नेहमीच्या अनुभवातले उदाहरण म्हणजे आपला घसा. घशात नाक, तोंड, श्वासनलिका आणि अन्ननलिका एकत्र येतात. त्यामुळे आपण एकाच वेळी श्वास घेणे आणि अन्न-पाणी गिळणे या गोष्टी करू शकत नाही. किंबहुना, या दोन्ही गोष्टी एकाच वेळी करण्याची गरजही नसते. म्हणूनच घशाचा गिळणे आणि श्वसन अशा दोन्ही कामांसाठी



वापर केला जातो. चुकून या दोन्ही गोष्टी एकाच वेळी करण्याचा प्रयत्न झाला तर आपल्याला जोरदार ठसका लागतो. मानवाच्या कामसुख घेणाऱ्या चेतापेशीसमूहाबाबतही काहीसा असाच प्रकार झाला.

कामसुख अनुभवणाऱ्या चेतापेशींचा अधिक कार्यक्षमपणे उपयोग करण्यासाठी त्यांच्याचकडे विविध रसायनांच्या सेवनाने होणाऱ्या सुखाचा अनुभव घेण्याचे कामही सोपवले गेले. कामसुख आणि रसायन-सेवन-सुख या दोन्ही गोष्टी अगदी एकाच वेळी करण्याची गरज नसते. त्यामुळे अशा प्रकारे त्या चेतापेशींचा अधिक कार्यक्षमपणे उपयोग होतो. पण कामसुख चेतापेशीसमूह हा प्राण्याला वारंवार ते सुख मिळवायला प्रवृत्त करतो. नराने वारंवार कामसुख मिळवण्याचा प्रयत्न केला तर त्याचा जास्तीत जास्त माद्यांशी समागम होऊन पुढच्या पिढीतल्या त्याच्या पिल्लांची संख्या जास्त राहते. तसेच, मादीने वारंवार कामसुख मिळवण्याचा प्रयत्न केला तर तिच्या एकाच विणीतल्या वेगवेगळ्या पिल्लांचे पितृत्व वेगवेगळ्या नरांकडे जाऊ शकते. त्यामुळे वेगवेगळ्या जनुकीय वारशाचा लाभ झाल्याने त्या पिल्लांपैकी काही पिल्ले प्रतिकूल परिस्थितीतही शिल्लक राहण्याची शक्यता वाढते. अशा रीतीने कामसुखाच्या हव्यासाचा फायदा पुढच्या पिढीत जास्त पिल्ले शिल्लक राहण्यात होतो. पण हाच चेतापेशीसमूह अशाच रीतीने रसायन-सेवन-सुख मिळवण्याचा हव्यास धरतो, तेव्हा त्याचे रूपांतर व्यसनामध्ये होऊ शकते. (अर्थात, याच कारणामुळे कामसुख हेही कामव्यसनात रूपांतरित होऊ शकते!)

सर्वसाधारणपणे कोणतेही व्यसन काळाबरोबर वाढत जाते. असे होण्याचे कारण आपल्या मेंदूच्या अनुकूलनक्षमतेत लपलेले आहे. आपल्या मेंदूची अनुकूलनक्षमता ही सर्वसाधारणपणे आपल्याला वरदान ठरते. या क्षमतेमुळे आपण कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीशी मुकाबला करू शकतो. प्रतिकूल परिस्थितीमुळे आपल्या मनात क्षोभ निर्माण होतो. त्याचा परिणाम आपल्या शरीरातल्या विविध ग्रंथींकडून अनेक जैवरसायने स्रवण्यात होतो. क्षोभामुळे निर्माण झालेल्या या जैवरसायनांच्या अतिरेकाचा आपल्या मेंदूतल्या चेतापेशींना त्रास होऊ शकतो. इथे ही अनुकूलनक्षमता आपल्याला उपयोगी ठरते. अनुकूलनामुळे चेतापेशी जैवरसायनांच्या पूर्वीएवढ्याच मात्रेने कमी प्रमाणात त्रस्त होतात. यामुळे मेंदू उद्वेगाच्या आवर्तातून बाहेर पडून परिस्थितीवर कशी मात करता येईल यावर विचार करू लागतो किंवा परिस्थिती स्वीकारून शांत राहू शकतो.

मेंदूतल्या चेतापेशींना मिळणारे रसायन-सेवन-सुखदेखील याच अनुकूलनामुळे काळाबरोबर घटत जाते. आधीच्या मात्रेतच व्यसनी व्यक्तीने ती रसायने घेतल्यास त्यांची पुरेशी झिंग येईनाशी होऊन व्यसनी व्यक्ती त्या रसायनाची जास्त मात्रा घ्यायला प्रवृत्त होते. सुरुवातीला चार टक्के टीएचसीने येणारी झिंग कालांतराने चाळीस टक्के टीएचसीनेही येईनाशी होते, असे आढळले आहे. यामुळे दोन घातक परिणाम होतात. व्यसनी व्यक्ती व्यसनाच्या अधिकाधिक आधीन होत जाते. ते रसायन मिळवण्यासाठी ती व्यक्ती गुन्हेगारी कृत्य करायलाही प्रवृत्त होऊ शकते. दुसरी गोष्ट म्हणजे, रसायनांच्या वाढत्या मात्रेबरोबर त्या रसायनांचे शरीरावर होणारे दुष्परिणाम वाढत जातात.

मॅरिहुआनाचे व्यसन लागते की नाही, यावर अनेक प्रयोग केले गेले आहेत. यातील बहुसंख्य प्रयोगांचा निष्कर्ष मॅरिहुआनाचे व्यसन लागते, असा आहे. आपण वर पाहिलेल्या चेतापेशींच्या विशिष्ट क्षमतांमुळे हे व्यसन वाढत जाते. एकदा व्यसन लागले की

त्या व्यक्तीला व्यसनमुक्त करणे अतिशय अवघड ठरते. म्हणून मुळात कोणालाही व्यसनापासून दूरच ठेवणे गरजेचे आहे. बऱ्याच देशांमध्ये असणाऱ्या कडक शिक्षांमागे हीच भूमिका आहे. कोलरॅडोमधल्या कायदेशीर प्रयोगाच्या विरोधकांच्या मते हा प्रयोग म्हणजे फक्त जगभरातल्या व्यसनी लोकांना कोलरॅडोमध्ये यायचे आमंत्रण ठरणार आहे. त्यामुळे व्यसनमुक्ती होण्याऐवजी फक्त व्यसनी व्यक्ती मुक्त म्हणजे मोकाट होऊन राजरोसपणे आपल्या व्यसनाचा प्रसार करत सुटतील!

कोलरॅडोमधल्या प्रयोगाच्या समर्थकांचे म्हणणे आहे की केवळ कडक शिक्षा देऊन व्यसनांची समस्या काही सुटत नाही. उलट, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या गुंडांना आणि भ्रष्ट प्रवृत्तीच्या कायदे-र(भ)क्षकांना यातून पैसे खायचे एक नवे कुरण उपलब्ध होऊन कायदा आणि सुव्यवस्थेची समस्या बिकट बनते. हे टाळण्याचा नवा मार्ग शोधण्यासाठीच कोलरॅडोमध्ये हा प्रयोग केला जात आहे!

अर्थात, कठोर शिक्षा किंवा मोकाट व्यसनी हे दोन्ही टोकाचे उपाय पाश्चिमात्य ऐहिक विचारसरणीवर आधारलेले आहेत. याखेरीज, आपल्या भारतीय विचारप्रणालीवर आधारित एक चांगला उपाय आहे. वैज्ञानिक प्रयोगांमध्ये व्यसनांचा उगम हा मेंदूत दडलेल्या आपल्या मनात असल्याचे सिद्ध झाले आहे. म्हणूनच व्यसनमुक्तीदेखील मनाला योग्य वळण लावल्यानेच साध्य होऊ शकेल. आधुनिक विज्ञानाने सर्व व्यसनांची चेतापेशींच्या गुणधर्मांशी जी सांगड घातली आहे, तिचा उपयोग करून व्यसनांची विषवल्ली मुळातच खुडून टाकण्याचा मार्ग हा उपाय दाखवतो. हा मार्ग आहे, योग्य वयात मुलांवर योग्य ते संस्कार करण्याचा. मुलांना, विशेषतः युवकांना सर्व व्यसनांची मोकळेपणाने माहिती देऊन त्यातल्या धोक्यांची जाणीव करून देण्याचा. पालकांनी स्वतःलाही सर्व व्यसनांपासून दूर ठेवून मुलांसमोर योग्य आदर्श निर्माण करून त्यांना योग्य त्या मार्गाने जाण्याची शिकवण देण्याचा.

आयुष्य म्हणजे केवळ मौजमजा नव्हे. यशाचा मार्ग हा अपयशाच्या काट्याकुट्यांतून जात असल्याने अपयशाने हबकून कुठल्यातरी व्यसनाच्या आहारी जाण्याऐवजी पुन्हा एकदा नव्या उमेदीने प्रयत्न करायला हवेत, हे युवकांना पटवून द्यायला हवे. प्रत्येक पालकाने या गोष्टी करणे शक्य आणि अत्यावश्यकही आहे. तरच नव्या पिढीला कडक कायदे किंवा मुक्त परवाने यांच्या जंजाळात न फसताही आपल्या मनाची शक्ती वापरून व्यसनमुक्ती साधता येईल. अखेर, भगवान गौतम बुद्धांचा 'अत्त दीप भव' हा संदेश प्रत्यक्षात आणून स्वतःच्या प्रज्ञेच्या दिव्याच्या प्रकाशात जीवनाचा सन्मार्ग स्वतः शोधण्याला पर्याय नाही!

**– सुधीर थत्ते**
फ्लॅट नं. ११३, टॉवर ए ६, गोदरेज गार्डन एन्क्लेव्ह,
पिरोजशानगर, विक्रोळी (पूर्व), मुंबई ४००० ०७९
भ्रमणध्वनी ९९८७५८८५८३
sudhirthattey@yahoo.com

## लेणी महाराष्ट्राची
### डॉ. दाऊद दळवी




भारतात बाराशे लेणी आहेत. त्यांपैकी आठशे महाराष्ट्रात आहेत! इसवी सनाच्या आरंभकाळाच्या आगेमागे बौद्ध महाराष्ट्रात आले, त्यांना सह्याद्रीच्या डोंगरदऱ्या व त्यातील कातळ, लेणी खोदण्यास योग्य वाटले. त्यामधून एक नवा कलाविष्कार या भूमीत प्रकटला. नंतर हजार-बाराशे वर्षांपर्यंत बौद्धांबरोबरच हिंदू व जैन पंथीयांनी महाराष्ट्रात सर्वत्र उत्तमोत्तम, विविध गुणदर्शी लेणी कोरली, याची महती सांगणारा दस्तावेज.

**मूल्य १२०० रुपये सवलतीत ७५० रुपये**

## मंदिर-शिल्पे
### डॉ. माया पाटील




डॉ. माया पाटील यांच्या प्रस्तुत ग्रंथातून मंदिर-स्थापत्य आणि मूर्तिशिल्पे यांच्या आधारे संस्कृतीची सांगोपांग तसेच अंतर्बाह्य माहिती सांगण्याचा प्रयत्न केला गेला आहे. यासाठी त्यांनी मराठवाड्यातील लातूर आणि उस्मानाबाद या दोन जिल्ह्यांतील विविध मंदिरांचा आणि मूर्तिशिल्पांचा सांगोपांग विचार केलेला आहे, विश्लेषण केलेले आहे. त्याची चित्रांसह सर्वंकष माहिती देणारा हा ग्रंथ.

**मूल्य ३०० रुपये सवलतीत १८० रु.**



# प्रयोगशील संगीतकार

**रमेश दिघे**

**पुण्यातील** चांदणी चौकाजवळील एका हॉटेलच्या हिरवळीवर पुष्कर जोग याच्या एका चित्रपटाच्या निमित्तानं पत्रकार परिषद चालू होती. बहुतेक पत्रकारमित्र परतीच्या मार्गावर होते. एका टेबलावर मी, आनंद मोडक आणि सुधीर मोघे गप्पा करत रंगलो होतो. मी आनंदला माझी आणि सुधीरची एक जुनी आठवण सांगत होतो. १९८७ साली मी, ललिता ताम्हणे आणि सुधीरची कविता 'पानोपानी'मधील सहकारी आणि माझी शालेय मैत्रीण विनया तांबे अर्थात मानसी मागीकर अशा तिघांनी मिळून 'नव संकल्पना' नावाचा दिवाळी अंक संपादित केला होता. चित्रपट, नाटक, नृत्य, संगीत अशा संपूर्ण कलाविषयक दिवाळी अंकाच्या मुखपृष्ठावर सुभाष अवचटचं चित्र आणि त्याला अनुलक्षून सुधीरची कविता असा वेगळा योग-प्रयोग आम्ही जुळवून आणला होता. त्याला 'व्वा! क्या बात है!' अशी दाद देत आनंद म्हणाला, ''कलेच्या प्रत्येक क्षेत्रात असे प्रयोग होत राहिले पाहिजेत.''

'प्रयोशील संगीतकार हरपला' अशा शीर्षकाची आनंद मोडक याच्या निधनाची बातमी वाचताना माझ्या मनात वरील आठवण तरळू लागली. आनंद हा माझ्यापेक्षा एकच वर्षानं मोठा. एकेकाळी 'डिलाईट'च्या अड्ड्यावर जे अनेक मित्र जोडले गेले त्यातलाच तो एक. तशी आमची फार घसट वगैरे नव्हती. कधी पुणे-मुंबई करताना डेक्कनमध्ये सुधीर मोघे भेटायचा तेव्हा मात्र गप्पांमध्ये आनंदचा विषय हमखास यायचा.

१३ मे १९५१ रोजी विदर्भातील अकोला येथे जन्मलेला आनंद शालेय शिक्षण संपल्यावर खास संगीताच्या आवडीने पुण्यात आला. पीडीए, थिएटर अॅकॅडमी अशा नाट्यचळवळींमध्ये वावरणाऱ्यांना प्रभ्या वाडेकर 'नाट्यपुंगव' म्हणायचा. एक दिवस जीनवर खादीचा कुडता घालून येणाऱ्या आनंदकडे पाहत प्रभ्या म्हणाला, 'या नाट्यपुंगव!' आनंद आला. आमच्याबरोबर चहा पीत बसला. 'संपली एकदाची बँक', तो चहाचा घुटका घेत म्हणाला. 'साले हे संघवाले' असं म्हणत त्याच्याच 'शाखेत'-महाबँकेच्या शाखेत काम करणाऱ्या एका सहकाऱ्याबद्दल तो काहीतरी कुरकुरत होता. 'अरे, मग बँक सोड ना', प्रभ्या म्हणाला. 'काय करणार बाबा! पापी पेट का सवाल है', आनंद दाढी खाजवत म्हणाला.

आनंद म्हणाला ते खरं होतं. नोकरी बँकेची असल्यानं त्याला अधूनमधून इस्त्रीच्या कपड्यांत टापटीप राहावं लागत होतं. कधीकधी चक्क टाय बांधावा लागत होता. त्यालाच नव्हे तर त्याच्यासारख्या अनेकांना नोकरीचे ठरलेले सोपस्कार पार पाडावे लागत होते. आनंदला नोकरीचा कंटाळा नव्हता. पण तिथल्या 'नाटकी' जगाचा त्याला उबग यायचा. या विशिष्ट चौकटीत जगणाऱ्या मध्यमवर्गीय पांढरपेशांचं घड्याळ्याच्या काट्यावरचं जग मर्ढेकरांनी त्यांच्या 'बदकांचं गुपित'मधून उघड केलं. त्याचा प्रयोग 'भरत'मध्ये छान रंगला होता. मर्ढेकरांच्या कवितांवरील या कार्यक्रमाचं दिग्दर्शन आणि संगीतदिग्दर्शन अशा दोन जबाबदाऱ्या

आनंदनं अतिशय चोख पार पाडल्या होत्या. चंद्रकांत काळे आणि माधुरी पुरंदरे ही गायक-कलाकार जोडी आणि जोडीला नंदू भेंडे व इतर. एक वेगळाच परिणाम साधणारी ही सांगीतिका होती. घाशीराम कोतवाल, तीन पैशांचा तमाशा, पडघम, महानिर्वाण असा नवतेचा 'महापूर' ओसरल्यावर काही वर्षांनी चंद्रकांत काळे, आनंद मोडक या मित्रांना रंगमंचावर पुन्हा काहीतरी वेगळं करण्याची हुक्की आली. त्यातून त्यांनी 'शब्दवेध' या संस्थेची स्थापना केली. अमृतगाथा, प्रीतरंग, साजणवेळा, आख्यान तुकोबाराय, शेवंतीचं वन आणि आता आज या देशात, असे एकापेक्षा एक सरस कार्यक्रम शब्दवेधनं सादर केले. राज्यभर त्यांचे चारशेहून अधिक प्रयोग झाले. 'रंगमंचीय आविष्कार' हेच या कार्यक्रमांचं मुख्य सूत्र होतं. 'शब्दवेध' आपलं रौप्यमहोत्सवी वर्ष साजरं करत असताना आनंदचं अकाली निधन झालं.

आनंदबरोबरचा हा सांगीतिक प्रवास समजावून घेण्यासाठी खरं तर चंद्रकांत काळेंना प्रत्यक्षच भेटायचं होतं. परंतु 'हा घे चंद्याचा नंबर' असं म्हणत एका मित्रानं दिलेला काळे यांचा नंबर 'रॉंग' निघाला. असं असलं तरी काळे यांची वृत्तपत्रीय प्रतिक्रिया 'दस नंबरी' नव्हे तर एक नंबर होती. चंद्रकांत म्हणतात, ''उत्तम काव्य, तितकंच उत्तम संगीत आणि नाट्यानुभव अशा संहिता घेऊन आम्ही शब्दवेधचे कार्यक्रम करायचो. नाटकाच्या अनुभवामुळे रंगमंचीय आविष्काराची भाषा आनंदला उत्तम अवगत होती. त्यामुळे त्याच्या संगीतात नेमकेपणा यायचा. गाण्यांसाठी चाली करताना अनेकदा वादविवाद व्हायचे. मात्र एखादी चाल नको म्हटल्यावर नवीन चाल करण्यासाठी त्यानं कधीच कंटाळा केला नाही.''

कंटाळा हा शब्द आनंदच्या शब्दकोषात नव्हताच. तो सतत कामात नव्हे, नव्या कामात गुंतलेला असायचा. रंगमंचीय सांगीतिक कार्यक्रम, नाटक, सांगीतिका, नभोनाट्य इथपासून ते शनिवारवाडा ध्वनि-प्रकाश हा ऐतिहासिक माहिती देणारा उद्‌बोधक उपक्रम, अशा बहुविध प्रकारांसाठी आनंदची संगीतयोजना आहे. अस्सल मासेखाऊ आनंदनं पाण्यात राहून माशांशी वैर कधी केलं नाही. संगीतक्षेत्रातील सर्वांशी त्याचे मैत्रीचे सूर जुळलेले होते. या संबंधातील एक आठवण श्रीधर फडके यांनी नोंदवलेली आहे. ते म्हणतात, ''आनंदची आणि माझी ओळख झाली आणि त्यानंतर वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या निमित्तानं आम्ही एकमेकांना भेटत राहिलो. कार्यक्रम नसला तरी आम्ही अनौपचारिकपणे एकमेकांना भेटत असू. संगीताच्या कामासाठी आनंद मुंबईत यायचा. आमच्या दादरच्या घरी राहायचा. बाबुजींची पेटी घेऊन त्यावर गाणी करत बसायचा.'' चंद्रकांत काळे-आनंद मोडक यांनी शब्दवेधच्या माध्यमातून सादर केलेल्या कार्यक्रमाची बाबुजींनी- सुधीर फडके- मुक्तकंठानं स्तुती केली होती. अमृतगाथा कार्यक्रमानंतर बाबुजींनी आनंद आणि चंद्रकांतला मुद्दाम भेटायला बोलावलं होतं. सुधीर फडके, राम कदम, वसंत पवार, श्रीनिवास खळे, प्रभाकर जोग, पंडित हृदयनाथ


## लवकरच प्रसिद्ध....




**तीव्र एकांतातल्या जीर्ण काळोखात**

**मनोहर जाधव**

**मूल्य १२० रुपये**
**सवलतीत ७० रुपये**

मनोहर जाधव यांच्या या संग्रहातील कवितांमधून व्यक्तीच्या सामाजिक आणि भावजीवनातील कल्लोळ रसरशीतपणे प्रकट झाला आहे. वेगवेगळ्या अनुभवांच्या बाह्य आणि अंत:स्तरावर व्यक्ती ज्या पद्धतीने प्रतिक्रिया देत असते ते पाहता या संग्रहातील कवितांचा पोत हा अनेकपदरी आहे. मानवी जीवनात एकच एक अनुभव प्रत्ययाला येत नसतो तर तो संमिश्र, विरोधाभासी तर कधी तर्कविरोधीही असतो. या अनुभवांचे आकलन आणि विश्लेषण हे देखील म्हणूनच व्यामिश्र स्वरूपाचे असते. माणसाचे आयुष्य कधीही गणिती पद्धतीने जात नसते तर ते अधिक कोलाहलाचे म्हणून अतर्क्यही असते. नव्वदोत्तर काळात तर हे आयुष्य अधिकच गुंतागुंतीचे झाले आहे. या सगळ्या संवेदनांचे चित्रण या कवितेतून अनुभवता येते.

**कल्याण**

**श्रीकांत पेटकर**




**मूल्य १०० रुपये**
**सवलतीत ६० रुपये**

'कल्याण' या पुस्तकाबद्दलचा श्रीकांत पेटकर यांचा हेतू हा अतिशय मर्यादित आहे. तो म्हणजे महाराष्ट्रातील इतर काही स्थळांप्रमाणे; ऐतिहासिक दृष्टिकोनातून कल्याण हे एक महत्त्वाचे ठिकाण आहे हे फक्त सांगणे! परंतु या सांगण्यामागची त्यांची तळमळ ही फार महत्त्वाची. त्यामुळे काटेकोर खरेपणाचा सविस्तर इतिहास, त्यातील तार्किकता आणि प्रत्येक छोट्या-मोठ्या बाबतीतल्या कारणमीमांसेचा शोध घेऊन, त्याची काहीशा उत्सुकतापूर्ण भाषाशैलीमधून मांडणी करणे हे या पुस्तकाचे ध्येय नाही. हे आपण ध्यानात घेतले तर लेखकाच्या वृत्तीतली सजगता आपल्याला निश्चितच भावते. म्हणून श्रीकांतजी हे यापुढे तार्किकता जपणारे अभ्यासक आणि वाङ्मयीन जोपासणारे 'कल्याणकर' ठरतील याची खात्री वाटते!

मंगेशकर, भास्कर चंदावरकर अशा मराठी चित्रपट संगीतात स्वत:चा स्वतंत्र ठसा निर्माण करणाऱ्यांच्या यादीत राम-लक्ष्मण, अजय-अतुल अशा संगीतकारांच्या जोड्या अपवादानंच आढळतात. आनंदला असं कोणाच्या जोडीनं काम करायला आवडायचं नाही. 'एकट्यानं काम केलं की गाण्याच्या चालीचं जे काही श्रेय अथवा अपश्रेय असेल ते एका माणसाचं असतं' असं तो म्हणायचा. 'ऐकावं (गुणी) जनांचं करावं मनाचं' अशी त्याची वृत्ती होती. यामुळेच मराठीतील श्रीनिवास खळे, हृदयनाथ मंगेशकर यांच्याप्रमाणेच हिंदीतील मदन मोहन, एस.डी. बर्मन, ओ.पी. नय्यर इत्यादी एकट्या संगीतकारांच्या रचना पुन्हा पुन्हा ऐकून आनंदनं- कोणाचीही कॉपी न करता - स्वत:चं वेगळेपण निर्माण केलं.

१९७१ साली '२२ जून १८९७' या ऐतिहासिक महत्त्वाच्या चित्रपटापासून आनंदची चित्रपट संगीताची कारकीर्द सुरू झाली. त्याचा इतिहास थोडक्यात असा... संगीतक्षेत्रात काहीतरी करायचं अशा इर्ष्येनं पुण्यात आलेला आनंद त्याच्या मावशीकडे राहायचा. त्याच्या बरोबर समोर मोहन गोखलेचं घर होतं. साहजिकच या 'समानशील' असलेल्या तरुण मुलांची दाट मैत्री झाली. शाळेत असल्यापासून नाटकात काम करत असलेल्या मोहनबरोबरच आनंदची थिएटर ॲकॅडमीत 'एन्ट्री' झाली. तिथेच त्याला रवी साठे भेटला. हे दोघं घट्ट मित्र असले आणि रवी हा आनंदचा 'फेवरिट' असला तरी त्याच्या प्रत्येक चित्रपटात रवीचा आवाज नव्हता. आनंदचे ७-८ चित्रपट असे आहेत की त्यात रवीचा आवाज अजिबात नाही. उलट दोघांतली मैत्री एवढी निखळ, की अमुक एखाद्या गाण्यासाठी नवा गायक सुचव असं आनंद रवीला हक्कानं सांगायचा. काही वेळेला तर आनंद अगदी वेगळाच गायक निवडायचा. अनिल कांबळे यांचं 'दूर रानातून हलके बासरीचा सूर आला' हे गीत गाण्यासाठी त्यानं भजनसम्राट अनुप जलोटांकडून ते गीत म्हणून घेतलं होतं. 'चौकट राजा'साठी दिलीप प्रभावळकर यांचा चौकटीबाहेरचा आवाज वापरला तर 'कळत-नकळत'मधील 'नाकावरच्या रागासाठी औषध काय?' या गाण्यासाठी अशोक सराफला 'मात्रा' जमवायला लावल्या. हे सर्व प्रयोग आनंदनं 'नकळत' नव्हे तर जाणूनबुजून केलेत. ते करताना त्या गीताच्या आशयाला धक्का लागू न देण्याची दक्षता आनंद आवर्जून घेत असे. संवेदनशील कवी व गीतकार ना.धों. महानोर यांचं 'एक होता विदुषक'मधील 'मी दु:खाच्या बांधून पदरी गाठी जपले तुज ओठी-पोटी कधी डोळ्यांना काजळ तुज भरताना जीव....' हे गीत विदुषकाची शोकांतिका अधोरेखित करणारं होतं. आनंदचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे चित्रपट कथानकाच्या काळाचं भान ठेवून त्याप्रमाणं संगीत देणं. 'हरिश्चंद्राची फॅक्टरी'चं दादासाहेब फाळके यांचा काळ जिवंत करणारं संगीत, संगीताची फॅक्टरी उघडणाऱ्या आजच्या संगीतकारांनी जरूर अभ्यासावं.

भास्कर चंदावरकर यांना गुरुस्थानी मानणाऱ्या आनंदच्या सांगीतिक व्यक्तिमत्त्वावर कुमारगंधर्वांचाही विलक्षण प्रभाव होता. त्यामुळे त्याच्या संगीतदिग्दर्शनात शास्त्रीय संगीत आणि भारतीय पारंपरिक वाद्यांचा सुयोग्य वापर यांचा मिलाफ ऐकायला मिळतो. आनंदमधील हे गुण अचूक हेरून सतीश अळेकरांनी 'महानिर्वाण'च्या संगीताची जबाबदारी आनंदवर सोपवली. तेथूनच त्याच्या संगीतदिग्दर्शनाच्या कारकिर्दीची सुरुवात झाली. 'आवा चालली पंढरपुरा' या महानिर्वाणमधील अभंगासाठी त्यानं बिलासखानी तोडीचा आधार घेतला. विजय तेंडुलकरांच्या 'विठ्ठला'साठी संत नामदेव, रामदास यांच्या अभंगाच्या चाली कीर्तन पद्धतीनं रचल्या. हे घुमानला संमेलन भरवणाऱ्या 'वरून' कीर्तनकारांना माहीत आहे नं?'



'विठ्ठला'साठी पायपेटी, मृदुंग, टाळ, एकतारी, चिपळी या पारंपरिक वाद्यांचा वापर करणाऱ्या आनंदनं 'तीन पैशांचा तमाशा'च्या दुसऱ्या व तिसऱ्या अंकाचं संगीत देताना (भास्कर चंदावरकर यांनी पहिल्या अंकानंतर हे नाटक मध्येच सोडलं.) तसंच 'पडघम'च्या चाली बांधताना आपण बॅले, पॉप, रॉक यांचा वापर तेवढाच चांगला करू शकतो हे दाखवून दिलं. पारंपरिक इतकेच पाश्चात्य संगीतप्रकार सहजतेनं हाताळणाऱ्या आनंदचा संगीताच्या क्षेत्रातील बदलत्या तंत्रज्ञानाचाही अभ्यास तेवढाच दांडगा होता.

या वर्षीच्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात पंडित हृदयनाथ मंगेशकर यांची डॉ. जब्बार पटेल यांच्याबरोबरीनं आनंदनं मुलाखत घेतली. त्यावेळी ''घाशीराम'चं संगीत द्यायला न मिळाल्याबद्दल खंत वाटते का'' या माझ्या (पत्रकारांमधून) प्रश्नावर, ''सुरुवातीला चर्चा झाली, पण नंतर ते काम चंदावरकरांकडेच गेलं. शेवटी ते पुणेकरांकडेच जाणार होतं'' असं हृदयनाथ यांनी सांगताच पत्रकार परिषदेत हशा पिकला. आनंदनं चष्म्यातून माझ्याकडं बघितलं. तीच आमची शेवटची 'नजर'भेट!

**- रमेश दिघे**

भ्रमणध्वनी ९४२३०४७४४०

rameshtdighe@gmail.com

# मौज प्रकाशनाची नवीन प्रकाशने




अमेरिकेतल्या वेगवेगळ्या प्रांतातील 'फॉल' सीझनची अवचटांच्या कॅमेऱ्याने टिपलेली ही अद्भुत दृश्यरूपं! या दृश्यरूपांना जाणून घेत, त्यांना शब्दांतून मूर्त करणारी अवचटांची संवादी मनोगतं, त्यांच्या नितान्तसुंदर कलादृष्टीची साक्ष देत राहतात.

## बहर शिशिराचा

अमेरिकेतील फॉल सीझन

### अनिल अवचट

किंमत ३०० रुपये   आर्टपेपरवर संपूर्ण चार रंगात छपाई




आर्थिक, राजकीय, सामाजिक प्रश्नांना सखोलपणे भिडणारं हे पुस्तक भारतातील दुष्काळाच्या इतिहासाचा सर्वांगीण वेध घेतंच; परंतु चीन, दक्षिण कोरिया, इथियोपिया या देशांनी आर्थिक प्रगती साधून सुकाळ कसा निर्माण केला याचंही तुलनात्मक विवेचन करतं.

निळू दामले यांच्या खास शैलीत टिपलेली ही बोलकी नि जिवंत चित्रं.

जत, चीन, दक्षिण कोरिया, ईथियोपिया

## दुष्काळ-सुकाळ

### निळू दामले

किंमत २०० रुपये




'आनंदमेवा' शिबिरात सहभागी झालेले पालक, त्यांची मुलं यांनी करायचा आपापल्या संगोपनाचा गिरवलेला आदर्श वस्तुपाठ, शिबिरातील विविध उपक्रमांच्या माध्यमातून हळूहळू कसा साकारत गेला त्याचं हे पुस्तक. केवळ आदर्श पालकच बनण्यासाठी नव्हे तर, स्वतःच्या जीवनशैलीत आवर्जून बदल करू इच्छिणाऱ्या वाचकांसाठी.

## आनंदमेवा

### डॉ. लता काटदरे

किंमत २०० रुपये

**मौज प्रकाशन** गृह, गोरेगांवकर लेन, मुंबई ४००००४ दूरध्वनी २३८७ १०५० इमेलः moujprakashan@gmail.com

# नारायण टिनपट्या

**श्रीकांत पेटकर**

**लहानपणी** माझे आजोबा, नंतर माझी आई नारायण टिनपट्याबद्दल सांगायची. तेव्हा 'टिनपट्या' या विचित्र नावाबद्दल उत्सुकता वाटायची. आता मोठेपणीही आईकडून नारायणरावांबद्दल ऐकताना त्यांच्याबद्दल कौतुक, अभिमान वाटतो. १९३०-३५च्या काळात नारायण टिनपट्या नावाचं व्यक्तिमत्त्व चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा इथे होऊन गेलं.

नारायण टिनपट्या हे खरं तर त्याचं नाव नव्हतंच. नारायणराव पेटकर असं त्यांचं खरं नाव. टिनपट्ट्यांपासून डबे बनवण्याचा त्यांचा धंदा होता. लोखंडी घमेल्यांना बूड बसवून देण्याचा त्यांचा व्यवसाय होता. त्यामुळे लोक त्यांना टिनपट्या नावानं ओळखत.

नारायणराव पेटकर अस्पृश्यतेविरुद्ध लढणारं बंडखोर व्यक्तिमत्त्व होतं. अस्पृश्यांची दाढी करायला न्हावी फार भाव खात. नारायणरावांनी एक सभा घेऊन सर्वांसमक्ष आपल्या हातांनी आपली दाढी केली. 'घरासमोरील कचरा आपण साफ करतो मग आपल्या तोंडावरचा कचरा साफ करायला काय हरकत आहे,' असं स्वत:चं मत मांडत त्यांनी सभा जिंकली.

गणपती फक्त सवर्णांच्या घरी बसवले जात. त्यांच्या उत्सवात भाग घेण्याचंही स्वातंत्र्य अस्पृश्यांना नव्हतं. नारायणरावांनी याविरुद्ध बंड उभारण्याचं ठरवलं. त्यांनी वरोड्याला आपल्या घरी गणपती बसवला. पूजाअर्चा, आरत्या होऊ लागल्या. यामुळे सनातनी लोकांच्या पोटात दुखू लागलं. ते हाणामारीच्या धमक्या देऊ लागले. देव बाटणार, धर्म बुडणार असा अपप्रचार करू लागले. नारायणराव डगमगले नाहीत. ते चांद्याला डी.सी.साहेबांना भेटायला गेले. डी.सी.साहेब कुणी इंग्रज गृहस्थ होता. मोडक्या-तोडक्या इंग्रजीत नारायणरावांनी त्यांची कैफियत मांडली. इंग्रजांचं भलं व्हावं यासाठी मी नवस करतो. नवसाप्रमाणे गणपती बसवतो तर मलाच धमक्या देतात. मला पोलिसांचं संरक्षण हवं, असं त्याला सांगितलं. त्या इंग्रज अधिकाऱ्यानं त्यांची दखल घेतली आणि काही शस्त्रधारी पोलिस वरोड्याला पाठवून दिले.

गणपती विसर्जनाच्या दिवशी नारायणरावांचा गणपती शस्त्रधारी पोलिसांच्या पहाऱ्यात सर्वात पुढे सरकत होता. त्यावेळी बाकीचे सवर्ण केवळ पाहण्याशिवाय काहीच करू शकले नाहीत.

नारायणराव पंढरपूरला मंदिरात जात. बाकी देवळांतही जात. ओळखीच्या सवर्णांना 'रामराम' घालून त्यांची चांगली जिरवत. अशा बंडखोरीमुळे कधी कधी त्यांना मारही मिळायचा. पण एकदा का त्यांच्यावर हल्ला करणारे पांगले की मग ते एकेकट्याला गाठत आणि बेदम मार देत असत.

'म्हार हाये' असं सांगितल्यावर रेल्वेस्टेशनवरील पोतदार नावाच्या हॉटेलमालकानं स्पेशल फुटक्या कपातून त्यांना चहा दिला. कालांतरानं त्याच हॉटेलमालकानं सन्मानानं चांगल्या कपातून चहा दिला. कारण नारायणराव सलीमखान नावानं मुसलमान झाले होते! हिंदू होते तोपर्यंत तिरस्कार करणारे, मुसलमान होताच हा द्वेष कुठे गायब झाला होता. विटाळ मानत नव्हतं. सन्मानानं वागवत होते.

नारायणराव घरगुती वाईट चालीरीतींविरुद्धही भांडत असत. नारायणरावांनी सासूला वठणीवर आणलं ही कथा तर लहानपणा-पासून ऐकत आलोय. ती अशी-

नारायणरावांच्या पुतणीला तिच्या सासूचा सासुरवास होता. फार त्रास द्यायची सासूबाई. कोण खरं, कोण खोटं तपासण्यासाठी नारायणराव रात्रभर झाडावर लपून बसले. पुतणीच्या घरचा गोंधळ ऐकला, बघितला. सासू खाष्ट असल्याचं त्यांनी ओळखलं. सासूला धडा शिकवण्याचं ठरवलं. दुसऱ्या दिवशी त्यांनी सासूला साडीचोळी करण्याच्या बहाण्यानं आपल्या गावी नेलं. पत्नीला पाहुणचार म्हणून पुरणपोळी करायला सांगितलं. पत्नीला समजावून सांगितलं, की जेवण वाढताना माझ्या ताटात तूप आणि सासूच्या ताटात तेल वाढायचं. मी रागावलो की दिवा विझवून टाकायचा. सूचनेप्रमाणे पतीपत्नी नाटक वठवू लागले.

बायकोनं त्यांना तूप आणि सासूला तेल वाढलं. नारायणराव संतापले, 'माझ्या ताटात तूप आणि तिच्या ताटात तेल काहून वाहाढलं थे सांग?' असं ओरडत ताडकन उठले. बायकोला मारायला धावले. ठरल्याप्रमाणे बायकोनं दिवा विझवला. नवरा-बायकोच्या भांडणात सासूबाई मध्ये पडल्या. अंधारात नारायणरावांनी तिलाच झोपडणं सुरू केलं. सासू म्हणायची, 'नारायणदादा, मी होय गा' आणि नारायणराव म्हणायचे, 'तू दूर होय वो बाई'.

'नारायणदादा, मी होय गा'.

'तू दूर होय गो बाई.'

असे संवाद सुरूच होते व नारायणरावांचं सासूला धपाटे लावणंही सुरूच होतं.

या प्रसंगानंतर पुन्हा ती सासू नारायणरावांच्या पुतणीच्या वाटेला गेली नाही.

असे हे नारायणराव टिनपट्याचे व्यक्तिमत्त्व फक्त वरोडा-चांदा भागातच मर्यादित राहू नये. सर्वांना त्यांची बंडखोरी कळावी, या उद्देशानं हा लेखनप्रपंच.

**- श्रीकांत पेटकर**
सुकृती सुरूल आर्ट्स
ए ९/३०२, चिनार बिल्डिंग,
लोकउद्यान, कल्याण (प) ४२१३०१
भ्रमणध्वनी : ९७६९२१३९१३
shrikantpetkar@yahoo.com

# ‘मनमौजी’ व्यंगचित्रकार अभिषेक तिवारी

**प्रभाकर वाईरकर**, व्यंगचित्रकार



**अभ्यासाव्यतिरिक्त** विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये खेळाचे मैदान, व्यायामशाळा व वाचनालय यांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. चपळता, अचूकता, शरीराचा सर्वांगीण विकास, सांघिक भावना, बुद्धिचातुर्य यांचा विकास मैदानावर होत असतो आणि त्यामधूनच यशस्वी खेळाडूचा जन्म होतो. व्यायामशाळा नसानसांमधून पुढील आयुष्य सुखी, आरोग्यदायी करण्यासाठी ऊर्जा निर्माण करते. तर वाचनालय नव्या-नव्या माहितीचे दीप उजळीत असते. पुस्तक वाचता-वाचता एखाद्याचा कटाक्ष पडतो आणि गालावर लालीमा पसरते. तर कधी पुस्तक अश्रूंच्या तलावात वाहू लागते. अतिरिक्त माहिती-ज्ञान यांनी मन आकाशाला गवसणी घालते. सुप्रसिद्ध, जगप्रसिद्ध, पद्मविभूषण, सर्वश्रेष्ठ, ज्ञानपीठविजेता वगैरे उपाधी मिळवण्यासाठी वाचनालय एक ‘शिडी’च! परंतु याच ‘शिडी’चा उपयोग करून ‘महान’, विद्याविभूषित वा वरीलप्रमाणे उपाधी मिळवल्यानंतर अगदी तुरळकच व्यक्ती वाचनालयाचा आपल्या ज्ञानभांडारात किती उपयोग झाला याचा उल्लेख करतात. सगळीच वाचनालये पुस्तकांचे भांडार नसतात. खेड्यातील वाचनालये काही पुस्तके व वर्तमानपत्रे अशी शिदोरी वाचकाच्या पुढे ठेवतात, तरीही त्या अल्प शिदोरीच्या जोरावर अनेक तरुण आपले भविष्य घडवत असतात. खेळ, संगीत, चित्रकला, राजकारण-समाजकारण, अर्थकारण, धर्मकारण वगैरे. असेच एक छोटेसे वाचनालय मध्यप्रदेशातील भिंड या गावी होते. त्या वाचनालयामध्ये एक तरुण न चुकता दररोज आपली हजेरी लावत असे. उपजतच वाचनाची आवड असल्याने सर्व वर्तमानपत्रे अगदी कोळून पीत असे. त्यातील राजकीय टीकाटिपणी व प्रकाशित झालेली व्यंगचित्रे पाहून त्यालाही वाटू लागले, की आपणही वेगळे काहीतरी करावे. गोल मार्केट या ठिकाणी असलेल्या या वाचनालयाचे नाव गांधी वाचनालय. हे वाचनालय नसते तर मी व्यंगचित्रकार झालोच नसतो, एवढे त्या वाचनालयाचे मोल जाणणारा व्यंगचित्रकार म्हणजे सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार ‘अभिषेक.’ अभिषेक तिवारी.

वडील रामलखन तिवारी व आई सत्यवती तिवारी यांचे अभिषेक हे एकुलते एक अपत्य. सरकारी तृतीय श्रेणीतील कर्मचारी असलेल्या बापाचे स्वप्न आपला मुलगा डॉक्टर वा इंजिनीयर व्हावा असेच होते. जे इतर बापांचे असते तसेच. कारण अभ्यासामध्ये अभिषेक हुशार होते. गणित, सायन्स हे त्यांचे आवडते विषय. परंतु ज्याप्रमाणे इतर यशस्वी चित्रकार त्यांच्या लहानपणी वह्यांची पाने, भिंती वा जमीन यांनाच ड्रॉईंग बोर्ड समजून चित्रे गिरबटतात (डुडलिंग) तीच अवस्था अभिषेक यांची होती. शालेय जीवनात शिक्षक व मित्रमैत्रिणींकडून त्यांना चित्रकलेसाठी प्रोत्साहन मिळत असे. त्यामुळे त्यांच्या मनात चित्रकलेविषयी ओढ निर्माण होऊ लागली.

१९८३-८४ च्या दरम्यान भिंड येथे स्थानिक व्यंगचित्रकार शोकीन गोयल यांनी त्यांच्या व्यंगचित्रांचे प्रदर्शन लावले व ते पाहताक्षणी अभिषेक यांच्या मनामध्ये पहिला अंकुर फुटला व्यंगचित्रे करण्याचा. त्यांना सहज वाटून गेले मीही ‘हे’ करू शकतो.

एकलव्याप्रमाणे व्यंगचित्रकलेची साधना सुरू झाली. विनोदबुद्धी व चित्रकलेची आवड यामुळे अभिषेक छोट्या-छोट्या विषयावर (चुटकुले) व्यंगचित्रे तयार करू लागले. वेगवेगळ्या वर्तमानपत्रांमध्ये - ग्वालियर स्थित- ती व्यंगचित्रे पोस्टाने पाठवू लागले. व्यंगचित्र छापले जात नव्हते.

१९८५ साली एका सकाळी, ईश्वराने वरदहस्त द्यावा व आपले अंग लखलखून निघावे व त्या ब्रह्मानंदामध्ये न्हाऊन जावे अशी अवस्था अभिषेक यांची झाली. दैनिक ‘आचरण’ या वर्तमानपत्रामध्ये पहिल्या पानावर ‘तिरछी नजर’ या सदराखाली अभिषेक यांचे पहिले पॉकेट कार्टून छापले गेले. अभिषेक तो क्षण

आजही विसरू शकत नाहीत.

उच्च शिक्षण घेण्यासाठी ग्वालियरला जाणे कसे आवश्यक आहे याची कल्पना वडिलांच्या गळी उतरवून अभिषेक यांनी जीवाजी वि.वि. ग्वालियर यामध्ये 'पुरातत्त्वशास्त्र' या शाखेमध्ये प्रवेश घेतला. समयोचित काळामध्ये 'पुरातत्त्वशास्त्र' या विषयामध्ये एम.ए. पदवी धारण केली.

कॉलेजसोबत व्यंगचित्रकलाही हातात हात घालून अभिषेकबरोबर चालत होतीच. परंतु राजकीय व्यंगचित्रकलेकडे कसे वळलात याचे उत्तर देताना, अभिषेक म्हणतात, ''घरी टाइम्स ग्रूपचे 'दिनमान' दैनिक वाचले जात असे. त्यामध्ये लक्ष्मण यांचे पॉकेट कार्टून पाहून मनामध्ये नेहमी ईर्ष्या निर्माण होई. त्याचप्रमाणे त्यावेळचे राजकीय वातावरण – मंडल कमिशन, आरक्षण याविरुद्ध विद्यार्थ्यांमध्ये रोष होता. आंदोलन शिगेला पोचले होते. आंदोलनामध्ये मी सामील झालो. आपल्या व्यंगचित्रकलेचे हत्यार घेऊनच...'' व्यंगचित्रांचा रतीब, राजकीय घडामोडींवर अभिषेक घालू लागला आणि त्यातूनच राजकीय व्यंगचित्रकाराची घोडदौड सुरू झाली.




व्यंगचित्रकलेतील रेखांकनाच्या शैलीविषयी बोलताना अभिषेक सांगतात, त्यांच्यावर सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार देवेंद्र यांच्या शैलीचा प्रभाव जबरदस्त झाला. देवेंद्र यांचे रेखाटन त्यांना अचूक उतरवता येत नाही. कारण त्यांनी चित्रकलेचे शिक्षण घेतलेले नाही. तरीही व्यंगचित्रकलेमध्ये विनोद, उपहास व मांडणी कशी करावी याचे ज्ञान देवेंद्रची व्यंगचित्रे पाहून झाले हे ते मान्य करतात.

अभिषेक यांची व्यंगचित्रांची शैली सुबक व सुटसुटीत आहे. जरी त्यांनी चित्रकलेचा अभ्यास केला नाही तरीही ज्या व्यक्तिरेखा ते रेखाटतात त्यातील नाट्य, हावभाव व रचना मनावर परिणाम करतात. काळ्या मार्करने ड्रॉईंग करून कम्प्युटरचा वापर करून त्यामध्ये रंगकाम करतात. त्यांची बहुतेक व्यंगचित्रे कॅप्शनसहित असतात.

'राजनीती' या व्यंगचित्रामध्ये डोळ्यांचा डॉक्टर आणि पेशंट यामधील संभाषण आधी नजरेत भरते व नंतर चित्र. नीतीमत्तेचा किती ऱ्हास झाला आहे हे या व्यंगचित्रातून अचूकपणे मांडले आहे.

व्यंगचित्रामध्ये 'बॅकग्राउंड'चा 'सटल' वापर, कॅप्शन हायलाइट करण्यासाठी नेहमीच एखाद्या रंगाच्या 'पॅच'चा वापर ते प्रामुख्याने करतात. 'मम्मा, झूठ बोलनेवाले अंकल...' या व्यंगचित्रामध्ये राजकीय लोकांची विश्वासाहर्ता किती रसातळाला गेली आहे याचे विदारक चित्रण केले आहे, लहान मुलाच्या तोंडामध्ये 'ते' वाक्य टाकून.

कधीमधी सिम्बॉल्सचा वापर करून ते व्यंगचित्रे रेखाटतात. भारतासाठी पाकिस्तानची भूमिका काय आहे हे दर्शवण्यासाठी इंग्रजी 'एस'च्या ठिकाणी साप दाखवला आहे. मार्मिक टिपणी, कमीत कमी रंग वापरून जास्त सफेद मोकळी जागा सोडणे ही



त्यांच्या चित्रकलेची पद्धत आहे.

चालू घडामोडींवर उत्तम भाष्य दाखवणारे ‘कडवी दवा’ हे व्यंगचित्र. महागाईने मेटाकुटीस आलेल्या, उपाशीपोटी सामान्य–जनांवर रेल्वे भाडेवाढीचा झालेला परिणाम अतिशय कल्पकतेने दाखवला आहे.

भिण्ड, मुरैना वगैरे गावांमध्ये दरोडेखोरांचे अड्डेच. हे दाखवण्यासाठी मिशीच्या ठिकाणी बंदुका दाखवून दरोडेखोराचे उत्तम चित्रण केले आहे.

सदरा, गळ्यात कापडी पट्टा व केस कमी झालेली व्यक्ती दाखवून ज्येष्ठ व राजकारण्याची मनोवृत्ती अचूक दाखवली आहे.

‘बलून’मध्ये वाक्य लिहिताना नेहमीच दोन रंगांचा केलेला वापर. जेणेकरून अपेक्षित परिणाम साधला जावा हे एक वैशिष्ट्य.

अभिषेक यांनी १९८५ पासून आजपर्यंत लाखाच्यावर व्यंगचित्रे तयार केली. ते दररोज ३–४ व्यंगचित्रे तयार करतात. या सर्व प्रवासात दैनिक ‘आचरण’चे श्री. रामविद्रोही व ए.एम. कुरेशी (संपादक आणि मालक) यांनी त्यांना व्यंगचित्रे काढायला पूर्ण स्वातंत्र्य दिले (१९८५–१९९०). त्यानंतर दैनिक ‘भास्कर’चे देवेंद्र तिवारी (महाप्रबंधक) आणि संपादक एल.एन. शीतल हे दोघेही अभिषेक यांच्यासाठी देवदूत बनले. व्यावसायिक व्यंगचित्रकार बनण्यासाठी लागणारा आत्मविश्वास आणि कोणत्याही समस्येचे निराकरण करण्यासाठी लागणारा उपाय त्यांच्याकडे होता तो त्यांनी अभिषेकना दिला. एल.एन. शीतल यांनी अभिषेक यांच्या वडिलांना भेटून ‘‘तुमचा मुलगा योग्य मार्गावर आहे. तुम्ही काळजी करू नका’’ असा विश्वास दिला. हा क्षण अभिषेक त्यांच्या जीवनातला सर्वोत्तम क्षण मानतात.

म्हणून वरील दोघांचे उपकार सात जन्मांतही फिटणार नाहीत असे ते मानतात. त्यांच्या कामावर संपादक एवढे खूष झाले की त्यांनी ‘स्टाफ कार्टूनिस्ट’ हे पद देऊन इंदूरच्या दैनिक ‘भास्कर’मध्ये पदोन्नती दिली. त्या ठिकाणीच त्यांच्यात पत्रकारिता, कला, लिखाण या व्यंगचित्रकार परिपूर्ण बनण्यासाठी लागणाऱ्या गुणांची जोपासना झाली. त्यानंतर दैनिक ‘हिंदुस्थान’, दैनिक ‘भास्कर’, जयपूर व १९९८ पासून आजपर्यंत ‘राजस्थान पत्रिका’, जयपूर या ठिकाणी असिस्टंट एडिटर/कार्टूनिस्ट या पदावर कार्यरत आहेत.

२००२ साली पिंक सिटी प्रेस क्लब अॅवॉर्ड त्यांना मिळाले.

२००८ साली साउथ एशियन कार्टून काँग्रेस, काठमांडू, नेपाळमध्ये सहभाग.

‘पत्रिका इन एज्युकेशन’ या कार्यक्रमाद्वारे देशातील अनेक मान्यवर शैक्षणिक संस्थांमध्ये व्यंगचित्रकलेचे धडे गेली आठ वर्षे देत आहेत.

‘शब्दविरहित’ व्यंगचित्र रेखाटणे कठीण. ‘शब्दविरहित’ व्यंगचित्रकलेसाठी ते सुधीर धार यांना गुरू मानतात. कम्प्युटरमुळे ‘फास्ट’ धावणाऱ्या जगाबरोबर धावणे सहजसोपे झाले आहे असे ते मानतात. व्यापारीकरणामुळे वर्तमानपत्रामध्ये ‘मुख्य’ व्यंगचित्र


**हुमान**

**संगीता उत्तम धायगुडे**




**नियतीनं घातलेली हुमानं सोडवत स्वत:ला सिद्ध करणाऱ्या स्त्रीचं आत्मकथन**

**मूळ किंमत ३५० रु.**
**सवलतीत २१० रु.**

**मे आय कम इन...?**

**कु. तन्वी दिनेश डोके**




**अपंगत्वावर मात करणाऱ्या एका मुलीचे अनुभवकथन**

**मूळ किंमत १२५ रु.**
**सवलतीत ७५ रु.**




छापणे कठीण झाले आहे. शिवाय मुख्य व्यंगचित्रामुळे महत्त्वाच्या व्यक्तींचा रोष ओढवू नये म्हणूनही मालकवर्ग मुख्य व्यंगचित्राला जागा उपलब्ध करून देत नसावेत असे अभिषेकना वाटते.

आतापर्यंतच्या कारकिर्दीत धमक्या वगैरे वाईट अनुभव आले नाहीत. एका विशिष्ट मर्यादेचे पालन ते करतात. कॅमेरा, पुस्तके व प्राणी हे त्यांचे मित्र आहेत. सकाळी ५ वाजता उठणे, व्यायाम, सकाळी ८ ते १० पर्यंत वर्तमानपत्रे वाचणे वगैरे. ११ ते १२ टीव्ही पाहणे, बातम्या ऐकणे, अडीच वाजता ऑफिसमध्ये जाऊन व्यंगचित्रे तयार करणे, नऊपर्यंत घरी येऊन ११.३०ला गुडनाईट असा त्यांचा दिनक्रम आहे.




त्यांची पत्नी ममता सुविद्य आहे. मोठा मुलगा अभिजीत (एम.टेक.) नोकरी करतो. लहान मुलगा रघू बारावी पास स्कॉलर आहे. आईसह अभिषेक हे एका छत्राखाली राहत आहेत.

उत्तर भारतातल्या लाखो घरांत अभिषेक यांचे नाव सुपरिचित आहे ते एक व्यंगचित्रकार म्हणून.

अविस्मरणीय घटनेचा उल्लेख करताना ते सांगतात, १९९१ मध्ये 'स्कूल ऑफ स्टडीज'चा ते विद्यार्थी होते. दरवर्षी होणाऱ्या वार्षिक कार्यक्रमामध्ये व्यंगचित्रकला स्पर्धा आयोजित करण्यासाठी त्यांनी दबाव टाकला. परंतु आवश्यक तेवढे स्पर्धेकरी नसल्याने त्यासाठी त्यांनी काही विद्यार्थ्यांना दहा-बारा दिवस व्यंगचित्रांचे धडे दिले. मनात हेतू असा होता की आपल्याला प्रथम पारितोषिक मिळावे. परंतु प्रत्यक्ष स्पर्धेनंतर निकाल लागला त्यामध्ये त्यांनीच शिकवलेला विद्यार्थी प्रथम पारितोषिकाचा मानकरी ठरला. आणि अभिषेक...! आजही ते सर्वजण जमले की 'तो' प्रसंग आठवून मनमुराद आनंद लुटतात.

**– प्रभाकर वाईरकर**
कावेरी, बी-४०५, वाकोला ब्रीज,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५
भ्रमणध्वनी : ९८२०५४३०८९
prabhakarwairkar@rediffmail.com



# सिक्वेल
## लेखन स्पर्धा

कुतूहल, उत्सुकता या भावना माणसाचं जीवन रोचक करतात. पुढे काय? - या प्रश्नातून या कुतूहलाची सुरुवात होते आणि आपण सगळेच या स्वप्नरंजनात रंगून जातो. एका अर्थाने 'आज' हा 'काल'चा सिक्वेल असतो आणि 'उद्या' नावाच्या 'आज'च्या सिक्वेलविषयी आपल्याला जबरदस्त कुतूहल असते.

**तर यंदाच्या 'साहित्य सूची'च्या दिवाळी अंकाचा विषयच आहे - सिक्वेल !**

साहित्य, चित्रपट, व्यंगचित्रे अशा अनेक माध्यमांतल्या सिक्वेल्सचा वेध घेणाऱ्या या अंकाचे खास आकर्षण आहे विख्यात लेखक भालचंद्र नेमाडे यांच्याशी 'हिंदूचा सिक्वेल' या विषयावर संजय भास्कर जोशी यांची मनमोकळी बातचीत. शिवाय या अंकाचे काही खास मानकरी आहेत - अविनाश सप्रे, गणेश मतकरी, आनंद जोशी, राजन खान, मोनिका गजेंद्रगडकर, सुबोध जावडेकर, नीरजा, प्रज्ञा पवार, श्रीरंग गोडबोले, रविमुकुल, शुभा गोखले, मधुकर धर्मापुरीकर... आणि असे अनेक मान्यवर!... आणि या स्पेशल अंकाचे अतिथी संपादक आहेत - संजय भास्कर जोशी.

**पण अशा मान्यवरांखेरीज इतरांना देखील या अंकात मानाचे स्थान असणार आहे. होय, तुम्ही देखील या भन्नाट कल्पनेत सामील होऊ शकता. त्यासाठी तीनच अटी : तुम्ही वाचनवेडे असायला हवे, लिहायची हौस हवी आणि भन्नाट कल्पनाशक्ती हवी. तर वाचकहो, तुमच्यासाठी एक अफलातून सिक्वेल लेखन स्पर्धा जाहीर करत आहोत...**

## 'साहित्य सूची' आयोजित 'राजहंस प्रकाशन' प्रायोजित सिक्वेल लेखन स्पर्धा

### - खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सिक्वेल लिहा -

**१. भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला'चा सिक्वेल, ज्याचे पहिले वाक्य असेल - 'मी पांडुरंग सांगवीकर. आज उदाहरणार्थ पंचाहत्तर वर्षांचा आहे...'**

**२. 'शाळा' या मिलिंद बोकील यांच्या कादंबरीचा सिक्वेल लिहा.**

**३. जी. ए. कुलकर्णी यांना 'तुती' आणि 'कैरी' या मालिकेतल्या कथांच्यानंतर त्याच मालिकेतली 'केळं' ही सिक्वेल कथा लिहायची होती, तर ती सिक्वेल कथा लिहा.**

